POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०९ ● मुंबई, गुरुवार, ११ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

पुणे आणि मुंबई महापालिकांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या

परिसरात मोठी खळबळ अन् सुरक्षा यंत्रणा सतर्क, काय घडलं नेमकं?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीला आणि महापौर कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्याने मंगळवारी प्रशासनात एकच खळबळ उडाली. महापालिकेच्या अधिकृत ई-मेल आयडीवर आलेल्या धमकीच्या संदेशात मुख्य इमारतीसह महापौर कार्यालयाला लक्ष्य करण्याचा उल्लेख करण्यात आला होता. या घटनेनंतर सुरक्षेच्या दृष्टीने तातडीची पावले उचलण्यात आली. अचानक आलेल्या या धमकीमुळे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले.

प्रशासनाची तातडीची कारवाई; इमारत रिकामी

धमकीची माहिती मिळताच महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी तातडीने सर्व संबंधित विभागांना सतर्कतेच्या सूचना दिल्या. सुरक्षेचा उपाय म्हणून मुख्य इमारतीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तसेच पुढील आदेश मिळेपर्यंत नागरिकांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी घालण्यात आली. कोणताही धोका टाळण्यासाठी संपूर्ण परिसर नियंत्रणाखाली घेण्यात आला असून प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

पोलिस, बीडीडीएस आणि सायबर सेलची संयुक्त तपासणी



पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीला आणि महापौर कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांनाही धमकीचा ईमेल आलाय.

धमकी मिळाल्यानंतर स्थानिक पोलिसांसह बॉम्ब शोधक आणि नाशक पथक, श्वान पथक आणि सायबर सेल घटनास्थळी दाखल झाले. इमारतीच्या प्रत्येक मजल्याची आणि महत्त्वाच्या विभागांची सखोल तपासणी करण्यात येत आहे. ई-मेल नेमका कुठून पाठवण्यात आला, त्यामागील उद्देश काय होता आणि धमकी खरी की खोटी याचा शोध तांत्रिक विश्लेषणाद्वारे घेतला जात आहे. तपास यंत्रणा डिजिटल पुरावे गोळा करून प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

नागपूरमधील ठिकाणे आणि आरएसएस मुख्यालयाचाही उल्लेख

धमकीच्या ई-मेलमध्ये केवळ पुणे महापालिकाच नव्हे, तर नागपूरमधील काही महत्त्वाच्या ठिकाणांचा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयाचाही उल्लेख असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले असून विविध सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय साधून माहितीची देवाणघेवाण सुरू आहे. कोणतीही शक्यता दुर्लक्षित न करता सर्व स्तरांवर खबरदारी घेतली जात आहे.

मुंबई महापौरांनाही धमकी

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांनाही धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्याची माहिती समोर आली आहे. या संदेशात महापौरांची अधिकृत गाडी आणि कार्यालयीन केबिन बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. या घटनेनंतर मुंबई महापालिका प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात येत आहे. ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत. तसेच महापौरांच्या सुरक्षेत आवश्यकतेनुसार वाढ करण्याबाबतही विचार सुरू आहे. दोन्ही शहरांतील घटनांमुळे सार्वजनिक संस्थांच्या सायबर सुरक्षेचा आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

ना आरोपपत्र, ना पीडितांना भरपाई

मुंब्रा रेल्वे अपघाताचे एक वर्ष, जखमी प्रवाशांनी गमावली नोकरी, झाले कर्जबाजारी



आरोपपत्र दाखल करण्यास विलंब

'रेल्वे पोलिसांनी तातडीने नामांकित संस्थेकडून या घटनेचा तपास करून घेतला ही कौतुकास्पद बाब आहे', असे रेल्वे अपघातग्रस्त प्रवासी कार्यकर्ते समीर जवेरी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, 'तज्ज्ञांच्या अहवालात रेल्वे अधिकारी दोषी आढळले आणि गुन्हाही दाखल झाला. मात्र, १२ महिने उलटूनही अद्याप आरोपपत्र दाखल झालेले नाही. कायद्यानुसार तीन महिन्यांत तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल करणे आवश्यक असते, जेणेकरून न्यायालय पुढील कारवाई करू शकेल. पीडित कुटुंबांना न्याय मिळण्यासाठी तपास यंत्रणेने विनाविलंब आरोपपत्र दाखल करावे'. जखमी प्रवाशांचे जीवन उद्ध्वस्तया अपघातात गंभीर जखमी झालेल्या अनेक प्रवाशांना कायमचे अपंगत्व आले असून त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला आहे. आर्थिक संकटाचा सामना करत असलेल्या पीडितांनी सरकारकडून कोणतीही पुरेशी मदत किंवा भरपाई न मिळाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

■मुंबई । प्रतिनिधी,

मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या भीषण अपघाताला ९ जून रोजी ठीक एक वर्ष पूर्ण झाले. मात्र, वर्षभरानंतरही या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पाच प्रवाशांच्या मृत्यूचे गूढ अद्याप उकललेले नाही. शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी) या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, या दुर्घटनेतील मृत प्रवाशांचे नातेवाईक आणि जखमी प्रवासी अद्यापही शारीरिक आणि मानसिक धक्क्यातून सावरलेले नाहीत.

दोन लोकल गाड्या एकाच वेळी क्रॉस होत असताना मुंब्रा स्थानकाजवळच्या एका वळणावर ९ जून २०२५ रोजी हा अपघात झाला होता. कसाराकडे जाणारी लोकल आणि कर्जतहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे (सीएसएमटी) जाणारी लोकल या दोन्ही गाड्या एकाच वेळी या वळणावर पोहोचल्या. यावेळी झालेल्या गोंधळात आणि समतोल बिघडल्यामुळे आठ प्रवासी रुळांवर कोसळले, तर इतर अनेक जण डब्यातच गंभीर जखमी झाले. रुळांवर पडलेल्या प्रवाशांपैकी पाच जणांचा जागीच मृत्यू झाला होता, तर या दुर्घटनेत एकूण १३ प्रवासी जखमी झाले होते.

या घटनेनंतर रेल्वे पोलिसांनी तपास करण्यासाठी तीन सदसीय समिती स्थापन केली होती. या समितीच्या निष्कर्षांच्या आधारे, ठाणे रेल्वे पोलिसांनी १ नोव्हेंबर २०२५ रोजी सहाय्यक विभागीय अभियंता विशाल डोळस आणि वरिष्ठ विभाग अभियंता समर यादव यांच्याविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. मुसळधार पाऊस झाल्यानंतरही या अभियंत्यांनी रुळांची दुरुस्ती केली नाही आणि त्यामुळेच हा अपघात घडल्याचे प्रथमदर्शनी अहवालात (एफआयआर) नमूद केले होते. त्यानंतर दोन्ही अभियंत्यांनी मुंबई उच्च न्यायालयातून अटकेपासून अंतरिम संरक्षण मिळवले आहे.


दोन्ही आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असून तपास सुरू असल्याची माहिती एका जीआरपी अधिकाऱ्याने दिली. सध्या या प्रकरणाचा तपास जीआरपी गुन्हे शाखेकडून केला जात आहे. वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूटच्या तपास अहवालाचा हवाला देत पोलिसांनी न्यायालयात सांगितले की, वारंवार सूचना देऊनही अभियंत्यांनी मुंब्रा आणि दिवा दरम्यानच्या खराब रुळांची दुरुस्ती केली नाही. मात्र, आरोपींच्या वकिलांनी व्हीजेटीआय ही केवळ तांत्रिक संस्था असल्याने रेल्वे आणि व्हीजेटीआय या दोघांचा संयुक्त अहवाल मागवण्याची मागणी केली. परिणामी, वर्ष उलटूनही या प्रकरणात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही.

मुंबईत नोकरीसाठी फक्त गुजराती-मारवाडी उमेदवारांना प्राधान्य! वादग्रस्त जाहिरात व्हायरल

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई ही स्वप्नांची नगरी म्हणून ओळखली जाते. मुंबईत अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध असतात. मुंबईतील नोकऱ्यांमध्ये स्थानिक मराठी उमेदवारांना पहिले स्थान मिळावे असा आग्रह स्थानिकांचा असतो. मात्र, सध्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका जाहिरातीने सर्वांचे लक्ष वेधले आहे. या जाहिरातीमध्ये मुंबईतील नोकऱ्यांमध्ये स्थानिक मराठी उमेदवारांना डावलून केवळ गुजराती आणि मारवाडी समाजातील लोकांना प्राधान्य देण्याची स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. या जाहिरातीमुळे मोठा वाद निर्माण झाला असून, मराठी तरुणांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सध्या सोशल मीडियावर नोकरीची एक जाहिरात व्हायरल होत आहे.
या जाहिरातीमध्ये केवळ मारवाडी आणि गुजराती लोकांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे म्हटले आहे.



नेमकं प्रकरण काय?

अहमदाबाद येथील एका भरती एजन्सीने नोकरी डॉट कॉम आणि लिंक्डइन या प्लॅटफॉर्मवर ही जाहिरात प्रसिद्ध केली आहे. जाहिरातीत मुंबईतील एका पदासाठी "Only Gujarati and Marwari candidates preferred" असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. यामुळे स्थानिक मराठी उमेदवारांना जाणीवपूर्वक दुय्यम स्थान दिल्याचा आरोप करण्यात येत आहे.

मराठी एकीकरण समितीचा संताप

मराठी एकीकरण समितीचे गोवर्धन देशमुख यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. नोकरी डॉट कॉम आणि लिंक्डइन या नोकरी शोधक संकेत स्थळावरती एक जाहिरात पाहिली. खरंतर ही जाहिरात आहे एजीएम आणि अकाऊंट, फायनान्सशी संबंधीत. त्यांना एक सीए हवा आहे. एक अहमदाबाद एजंसी आहे तिने ही जाहिरात टाकली आहे. 5 जून रोजी ही जाहिरात टाकण्यात आली आहे. नोकरी आहे मुंबईमध्ये आणि वेतन बघा तुम्ही 20 ते 25 लाख रुपये आहे. त्यांना हे मराठी माणसाला नाही द्यायचे. जाहिरातीवर काय लिहिले आहे "Only Gujarati and Marwari candidates preferred" मराठी माणसाने कुठे जायचं? यावर शासन कडक भूमिका घेणार आहे की नाही? दरवेळी आम्ही कायदा हातात घेतला पाहिजे का? असा सवाल देशमुख यांनी केला आहे.

परप्रांतीयांना सतत संधीचा आरोप

मुंबई हे महाराष्ट्राची राजधानी असतानाही येथील बहुसंख्य नोकऱ्यांमध्ये बाहेरच्या राज्यातील लोकांना प्राधान्य दिले जाते, असा सातत्याने आरोप होत असतो. या पार्श्वभूमीवर ही जाहिरात समोर आल्याने मराठी तरुणांमध्ये असंतोष वाढला आहे.

वसईत धक्कादायक प्रकार

मध्यरात्री पाठलाग करत घरी आला, मागून फ्रॉकमध्ये हात घातला अन्...

■मुंबई। प्रतिनिधी,

एक धक्कादायक घटना घडली आहे. एक महिला कामावरुन घरी जात असताना तिचा एका अज्ञात व्यक्तीने पाठलाग केला. तो तिच्या इमारतीपर्यंत पोहोचला. त्यानंतर त्याने महिलेला पाठीमागे जाऊन हळून स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर जे काही केलं त्याचा सीसीटीव्ही फूटेज पाहून पोलिसांना देखील धक्का बसला आहे. महिलेच्या तक्रारीनंतर पोलीस सध्या आरोपीचा शोध घेत आहेत. आता नेमकं काय घडलं? जाणून घ्या...

नेमकं काय घडलं?

ही घटना वसईच्या माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला वसई पश्चिमेतून कामावरुन घरी परतत असताना एका अज्ञात व्यक्तीने तिचा पाठलाग केला. पाठलाग करत करत आरोपी तिच्या इमारतीपर्यंत पोहोचला. आजूबाजूला कोणी नसल्याचे पाहून त्याने महिलेच्या इमारतीच्या परिसरात तिचा विनयभंग केला. तो मागून हळूच महिलेच्या जवळ गेला. त्याने महिलेच्या फ्रॉकमध्ये खालून हात घालून तिचा विनयभंग केला. यासोबतच त्याने अश्लील कृत्य केल्याचाही आरोप करण्यात आहे.

पोलिसात तक्रार दाखल

या घटनेनंतर महिलेने तातडीने पोलिसात धाव घेतली. तिने या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ आणि ७८ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. आरोपीने फिकट गुलाबी रंगाचा टी-शर्ट, काळी जीन्स आणि सँडल घातल्याचे तक्रारीत नमूद आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेतला जात आहे.

वसईमध्ये आणखी एक धक्कादायक घटना

वसईमधून आणखी एक भयानक घटना समोर आली आहे. वसई रेल्वे स्थानकाजवळील स्कायवॉकवर प्रेयसीच्या आई-वडिलांनी लग्नाला विरोध दर्शवल्याने नैराश्यात आलेल्या एका तरुणाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र, माणिकपूर पोलिसांच्या तत्परतेमुळे त्याचा जीव वाचला. या घटनेसाठी पोलिसांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

ही घटना ५ जून रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास घडली. लग्नाला नकार मिळाल्याने मानसिक तणावात असलेल्या तरुणाने स्कायवॉकच्या दिशेने धाव घेतली. मित्रांनी समजावण्याचा प्रयत्न केला, तरी तो कोणाचेच ऐकण्याच्या मानसिकतेत नव्हता. अखेर त्याने स्कायवॉकच्या कठड्यावर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

मशिदीत 14 वर्षीय मुलीवर नको तेच... लाज आणणारा प्रकार

उत्तर प्रदेशातील फिरोजाबादमधून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका मशिदीत आलेल्या 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला. आरोपीची ओळख इमाम झाकीर हुसैन अशी आहे. दरम्यान पोलिसांच्या चकमकीत आरोपीच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. पीडित मुलगी सोमवारी दुपारी उर्दू शिकण्यासाठी गेली असता, रामगढ मशिदीत हा लज्जास्पद प्रकार उघडकीस आला. पोलिसांच्या माहितीनुसार, आपण कोंडीत सापडलो आहोत हे पाहून त्याने पिस्तुलने पथकावर गोळीबार केला. मात्र प्रत्युत्तर म्हणून त्याच्यावर गोळीबार करण्यात आला असता, त्याच्या पायाला गोळी लागली, ज्यात तो जखमी झाला. त्याला एका शासकीय ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आले होते. घडलेल्या घटनेनुसार, ही घटना दुपारी दीड वाजता रामगढ येथील जन्नती मशिदीत घडल्याचे वृत्त आहे. रामगढची 14 वर्षीय मुलगी तिथे उर्दू शिकायला जायची. नातेवाईकांच्या माहितीनुसार, इतर मुलं निघून गेल्यानंतर इमाम झाकीरने तिच्याकडे पाण्याची मागणी केली. ती पाणी आणायला जाताच, त्याने तिला आपल्या खोलीत ओढून नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेनं कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली आणि नंतर रडत रडत घराबाहेर आली, तिथे मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती, जेव्हा पीडिता घरी गेला असता, तिने घडलेला सर्व प्रकार आईला सांगितला. त्याचक्षणी नातेवाईक आणि शेजारचे मंडळी मशिदीकडे धावून आले होते. दरम्यान आईने दिलेल्या माहितीनुसार, पोलिसही घटनास्थळी दाखल झाले.



मुंबई एअरपोर्टवर सीआयएसएफ महिला जवानांच्या तत्परतेमुळे टळला अनर्थ

सीपीआर देत वाचवला प्रवासी महिलेचा जीव

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई विमानतळाच्या सिक्युरिटी होल्ड एरियामध्ये एक प्रवासी महिला अचानक बेशुद्ध पडली. मात्र, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या दोन महिला जवानांनी प्रसंगावधान दाखवत तात्काळ सीपीआर आणि प्रथमोपचार दिल्याने मोठा अनर्थ टळला. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ समोर आला असून दोन्ही महिला जवानांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

सीआयएसएफ ने दिलेल्या माहितीनुसार, "एक प्रवासी महिला अचानक जमिनीवर पडली. त्यावेळी परिसरात काही क्षण गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी एल/एसआय (एक्झे.) अंजली सिध आणि एल/एचसी (जीडी) के. यू. सुनीता यांनी वेळ न दवडता तात्काळ महिलेकडे धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत सीपीआर आणि प्रथमोपचार सुरू केले."

सीआयएसएफ कडून महिला जवानांचे कौतुक

या घटनेमुळे केवळ सुरक्षा पुरवण्यापुरतीच सीआयएसएफ ची भूमिका मर्यादित नसल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे. आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना मदत करण्यासाठी सीआयएसएफ कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे वैद्यकीय संकट किंवा इतर अनपेक्षित घटनांमध्ये ते अनेकदा मदतीसाठी पुढाकार घेतात.



विमानतळावरील वैद्यकीय पथक घटनास्थळी पोहोचेपर्यंत दोन्ही महिला जवान सातत्याने प्रयत्न करत होत्या. त्यांच्या वेळेवर केलेल्या मदतीमुळे महिलेची प्रकृती स्थिर करण्यात यश आले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी तिला वैद्यकीय पथकात पाठवण्यात आले.

व्हिडीओत कैद झाला थरारक क्षण

सीआयएसएफ ने प्रसिद्ध केलेल्या व्हिडीओमध्ये संबंधित महिला प्रवासी सिक्युरिटी होल्ड एरियाकडे जात असताना अचानक पडल्याचे दिसते. महिला खाली पडताच प्रवासी आणि विमानतळ कर्मचारी मदतीसाठी धावताना दिसतात.

याचवेळी अंजली सिध आणि के. यू. सुनीता यांनी तात्काळ प्रतिसाद देत महिलेला मदत केली. दोन्ही महिला जवानांनी क्षणाचाही विलंब न करता सीपीआर देण्यास सुरुवात केल्याचे व्हिडीओमध्ये दिसते.

सीआयएसएफ नेही दोन्ही महिला जवानांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि मदतीसाठी दलाची असलेली बांधिलकी त्यांच्या कृतीतून दिसून आली, असे निवेदनात म्हटले आहे.

कल्याणमध्ये मध्यरात्री अचानक गोळीबार अन् तुफान राडा... हादरवून टाकणारी घटना

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण पूवेर्तील आत्मानगर परिसरात दोन गटांमधील जुन्या वादाने बुधवार (10 जून) रात्री हिंसक रूप धारण करत थेट गोळीबारापर्यंत मजल मारली. या धक्कादायक घटनेत राहुल वर्मा हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मध्यरात्री झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नेमकं काय घडलं?

माहितीनुसार, खडेगोळवली येथील आत्मानगर परिसरात बिंदू आणि प्रेम गुंडा या दोन गटांमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वाद सुरू होता. किरकोळ कारणांवरून दोन्ही गटांमध्ये वारंवार हाणामारी आणि वादाचे प्रकार घडत असल्याची माहिती समोर आली आहे. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी रात्री उशिरा दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आले. सुरुवातीला झालेला वाद काही वेळातच हाणामारीत बदलला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली.

कल्याण पूवेर्तील आत्मानगर परिसरात दोन गटांमधील जुन्या वादातून झालेल्या राड्याचे पर्यवसान गोळीबारात झाले. या धक्कादायक घटनेत राहुल वर्मा हा तरुण गंभीर जखमी झाला आहे.



या प्रकरणात पोलिसांनी तातडीची कारवाई करत चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. तसेच आरोपींची परिसरात परेडही काढण्यात आली. या घटनेनंतर पोलिसांनी परिसरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात करून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष खबरदारी घेतली आहे.

वादाच्या दरम्यान अचानक गोळीबार झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, तब्बल तीन राऊंड फायरिंग करण्यात आले. या गोळीबारात राहुल वर्मा हा तरुण गंभीर जखमी झाला. गोळीबाराचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली, तर अनेकांनी सुरक्षिततेसाठी घराबाहेर पडणे टाळले. घटनेची माहिती मिळताच कोळशेवाडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी राहुल वर्मा याला त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर वरिष्ठ पोलीस अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

दरम्यान, आत्मानगर परिसरात काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींची दहशत वाढत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. वारंवार घडणाऱ्या मारामाऱ्या, वाद आणि गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई करून परिसरात शांतता प्रस्थापित करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

पोलिसांकडून गोळीबारामागील नेमके कारण, वापरण्यात आलेले शस्त्र, तसेच या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा सखोल तपास सुरू आहे. तपासानंतर या घटनेबाबत अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक


पडद्याआडचे युद्ध



पश्चिम आशियातील संघर्ष आता १०० दिवसांचा टप्पा ओलांडून अशा एका वळणावर पोहोचला आहे, जिथे केवळ लष्करी आक्रमकता नाही, तर जागतिक मुत्सद्देगिरीचीही कसोटी लागत आहे. हे युद्ध केवळ या तीन देशांपुरती मर्यादित नसून, ते संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीला विळखा घालत आहे.

सध्या या संघषार्तील सर्वात मोठी अडचण लष्करी कारवाईची नसून, शांतता कराराच्या मसुद्याची आणि अटींची आहे. अमेरिका आणि इराण या दोघांपैकी कोणाचाही या युद्धात पूर्ण विजय झालेला नाही आणि कोणीही पूर्णपणे हरलेले नाही. दोन्ही देशांना आर्थिक आणि राजकीय कारणांमुळे हा करार हवा आहे. पण खरी कोंडी अशी आहे की, हा करार अशा पद्धतीने तयार करायचा आहे, जेणेकरून दोन्ही बाजूंना स्वतःचा 'विजय' म्हणून आपापल्या देशातील जनतेला आणि कट्टरपंथीय नेत्यांना तो दाखवता येईल. दोन्ही देशांमधील अंतर्गत राजकारण, तिथल्या नेत्यांचे स्वभाव आणि परस्परविरोधी मागण्या यामुळे करारावर स्वाक्षरी होण्यास अडथळे येत आहेत. इराणचे नेतृत्व सध्या मोज्तबा खामेनी यांच्याकडे आहे. आपले वडील अमेरिका-इस्रायली हल्ल्यात मारले गेल्यामुळे ते सुरक्षित स्थळी असून, त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी मध्यस्थांना 'कुरिअर यंत्रणेचा' वापर करावा लागत आहे. यामुळे करारातील साध्या बदलांना उत्तर यायलाही अनेक दिवस लागत आहेत. खामेनी यांच्यावर त्यांच्याच देशातील 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स'च्या कट्टरपंथीयांचा मोठा दबाव आहे. अमेरिकेने आमचे अनेक मोठे नेते मारले असल्याने त्यांच्यासमोर इराणने अजिबात झुकू नये, अशी या लष्करी अधिकाऱ्यांची भूमिका आहे. दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी स्वभाव या चचेर्ला वारंवार खिळ घालत आहे. ट्रम्प यांनी आपल्याच दूतांनी ठरवलेल्या अटी अचानक बदलल्या आहेत. एप्रिलमधील चर्चेत अणू कार्यक्रमाला १० वर्षांची स्थगिती देण्याचे मान्य करून नंतर ट्रम्प यांनी अचानक २० वर्षांची अट लादली, ज्यामुळे पाकिस्तानमधील बोलणी फिसकटली होती. इराणचा प्रदीर्घ काळापासून असलेला अविश्वास आणि ट्रम्प यांच्या या अनपेक्षित अटींमुळे हा करार सध्या 'ना युद्ध, ना शांतता' अशा चक्रव्यूहात अडकला आहे. या अंतर्गत राजकीय वादामुळे आणि अनिर्णित अवस्थेमुळे 'हॉर्मुझची खाडी' जागतिक अर्थव्यवस्थेसाठी एक आव्हान ठरत आहे. जगातील एकूण तेल आणि वायू पुरवठ्याचा तब्बल पाचवा हिस्सा याच अत्यंत महत्त्वाच्या जलमार्गावरून वाहून नेला जातो. अमेरिका इराणच्या बंदरांची नाकेबंदी करून स्वतःचे पारडे जड करण्याचा प्रयत्न करत आहे, तर इराणने या खाडीचे शस्त्रास्त्रीकरण करून जागतिक वाहतूक रोखली आहे. या 'वाटाघाटींच्या आत सुरू असलेल्या पडद्याआडच्या युद्धामुळे' जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा पुरवठा खंडित झाल्यामुळे इंधनाचे दर गगनाला भिडले आहेत आणि वाहतूक खर्च वाढल्याने जगभरात महागाईचा भीषण भडका उडाला आहे. या जागतिक आर्थिक संकटाची थेट आणि गंभीर झळ भारतासारख्या विकसनशील देशालाही मोठ्या प्रमाणात बसत आहे. देशांतर्गत तेल कंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारातील वाढत्या ऊर्जा खचार्चा सामना करावा लागत आहे. याचा परिणाम म्हणून, भारतात अवघ्या तीन महिन्यांत घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत झालेली दुसरी वाढ हे याचेच स्पष्ट आणि ज्वलंत उदाहरण आहे. पश्चिम आशियातील हा तणाव आपल्यापासून भौगोलिकदृष्ट्या दूर असला, तरी सामान्य भारतीय नागरिकांच्या खिशावर आणि कौटुंबिक बजेटवर त्याचा थेट परिणाम होत आहे. इराणचा राजनैतिक कयास असा आहे की, अमेरिकेतील पेट्रोल पंपांवरील वाढते दर आणि ढासळती जागतिक अर्थव्यवस्था यामुळे शेवटी ट्रम्प यांनाच माघार घ्यावी लागेल. ट्रम्प काही आठवडे तग धरू शकतील, पण आंतरराष्ट्रीय निबंर्धांचा चार दशकांहून अधिक काळ सामना करणारा इराण मात्र पुढील अनेक महिने लढा सुरू ठेवू शकतो, या आत्मविश्वासावर ते आपली भूमिका ताणून धरत आहेत.या संपूर्ण आंतरराष्ट्रीय समीकरणात सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा ठरत आहे तो म्हणजे अमेरिका आणि इस्रायलमधील वाढते मतभेद. ट्रम्प यांना या वर्षाच्या अखेरीस अमेरिकेत मध्यावधी निवडणुकांचा सामना करायचा आहे, त्यामुळे त्यांना इंधन दर नियंत्रणात आणण्यासाठी हा करार लवकरात लवकर हवा आहे; परंतु इराणची गोठवलेली २४ अब्ज डॉलर्सची मालमत्ता मुक्त करण्याची अट ट्रम्प यांच्यासाठी देशांतर्गत राजकारणात कमालीची अडचणीची ठरू शकते, कारण त्यांचे राजकीय विरोधक त्यांच्यावर 'कमकुवत' असल्याचा आणि इराणसमोर झुकल्याचा आरोप करू शकतात. दुसरीकडे, अमेरिकेचा सर्वात मोठा मित्रदेश असलेला इस्रायल मात्र पूर्णपणे वेगळ्या धोरणात्मक पातळीवर काम करत आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू हे आपल्या देशातील कट्टर-उजव्या विचारसरणीच्या आघाडी सरकारमुळे आणि राजकीय अस्तित्वासाठी कोणत्याही प्रकारची तडजोड करण्यास तयार नाहीत. अमेरिकेचा मुख्य उद्देश इराणला केवळ अण्वस्त्रे मिळवण्यापासून रोखणे आणि स्वतःचे सार्वभौम सुरक्षा हित जपणे हा आहे. याउलट, इस्रायलला लेबनॉनमधील हिजबुल्लाहचा प्रादेशिक धोका समूळ नष्ट करायचा आहे, गाझा आणि सीरियामध्ये लष्करी मोहिमा तीव्र ठेवायच्या आहेत आणि 'ग्रेटर इस्रायल'चे स्वप्न पूर्ण करायचे आहे. इराणने युद्धबंदीसाठी लेबनॉनमधील इस्रायली कारवाया थांबवण्याची अट घातली आहे, जी इस्रायलला पूर्णपणे अमान्य आहे. या परस्परविरोधी धोरणांमुळे अमेरिका आणि इस्रायलच्या हितसंबंधांमध्ये उघडपणे दरी निर्माण झाली आहे. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हॉन्स यांनीही हे मान्य केले आहे की, अनेक बाबतीत साम्य असले तरी काही परिस्थितींमध्ये अमेरिका आणि इस्रायलचे हितसंबंध एकमेकांपासून वेगळे आहेत.जर ट्रम्प प्रशासन आपल्या मित्रदेशाला म्हणजेच इस्रायलला शांत करण्यात आणि इराणसोबतच्या या शांतता करारावर स्वाक्षरी करण्यात अपयशी ठरले, तर हा प्रादेशिक वणवा वेळेतच विझवता येणार नाही. परिणामी, संपूर्ण जागतिक पुरवठा साखळी कोलमडून पडेल आणि जग एका आर्थिक मंदीच्या आणि विनाशाच्या गर्तेत लोटले जाईल.

ही अस्थिरता अराजकतेकडे नेऊ शकते?



महाराष्ट्रात या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागल्यामुळे सर्व कामे ठप्प झाली आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीला खीळ बसली असून महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या घटकांकडून सुरु आहेत.

राज्यात सध्या निवडणुकीचे वारे वाहत असून पहिल्या राउंडमध्ये महायुती वरचढ ठरली आहे. तर महाविकास आघाडीचा पाला-पाचोळा झाल्याचे चित्र समोर आले आहे. महाविकास आघाडीने दिलेले उमेदवार पळून गेल्याने सहा ठिकाणी महायुतीचे उमेदवार निवडणूक न लढवता विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागल्यामुळे सर्व कामे ठप्प झाली आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीला खीळ बसली असून महाराष्ट्रात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या घटकांकडून सुरु आहेत. पुणे व नाशिक हे दोन जिल्हे विविध विषयाने सध्या महाराष्ट्राच्या गुन्हेगारीमध्ये गाजत आहेत.

महायुतीमध्ये रस्सीखेच सुरु असून तीच परिस्थिती महाविकास आघाडीमध्ये दिसत आहे. मित्र पक्ष परस्परांवर चिखलफेक करत आहेत. बंडखोरी शमविण्यात महायुतीला ५० टक्के यश आले आहे. त्यामुळे महायुतीबाबतही निराशा झाली आहे. या निवडणुकीमुळे महत्वाचे विषय बाजूला पडले आहेत. अशोक खरात या भोंदू बाबाने तंत्र-मंत्राच्या आधारावर कोट्यवधींची संपत्ती राजकारण्यांच्या आशीर्वादाने जमा केली आहे. तर इकडे नीट पेपर फुटीमुळे शिक्षण क्षेत्रात गोंधळ झाला आहे. तर तिकडे राहुल गांधी मोदीसरकार हे वर्षभरात पडणार अशी भविष्यवाणी व्यक्त करीत आहेत.

महायुतीमधील घटक पक्षात आता स्थिरता राहिली नसून आरोप प्रत्यारोप आता सुरु आहेत. संभाजीनगर जिल्ह्यातील शिवसेनेचे अब्दुल सत्तार यांनी भाजप विरोधात आघाडी उघडली आहे. तर इकडे संजय राऊत यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येणाची चर्चा सुरु केली आहे. ज्यांना पश्चाताप होत असेल त्यांना मातोश्रीचे दरवाजे उघडे आहेत. गेल्या काही महिन्यात उद्धव ठाकरे यांनी गद्दारांना आमच्याकडे थारा नाही असे वक्तव्य केले आहे. विरोधकांमध्ये फूट पाडण्याचे उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. राष्ट्रवादीचे विलीनीकरण बाजूला पडले असतांना दोन्ही शिवसेना एकत्र येणाचे राजकारण सुरु आहे. राज्यात एकूण सर्वत्र गोंधळ सुरु आहे. राज्यात पुन्हा कायदा सुव्यस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पुणे पिंपरी चिंचवड आदी भागात विषारी दारूने माणसे मरत आहेत. २१ पोलिसांना व वरिष्ठांना निलंबित केले असले तरी मुख्य प्रश्न सुटत नाहीत. नीट पेपर फुटीमुळे तर केंद्र व राज्य सरकारची अब्रू चव्हाट्यावर आली आहे. याच बरोबर नाशिकचे टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरण गाजत आहे. याप्रकरणीचा तपास सीआयडी सीबीआय क्राईम ब्रांच करीत असले तरी अजून ते कोणत्याही निष्कर्षापर्यन्त आले नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह खात्याचा कारभार आहे. सध्या कायदा सुव्यवस्था या बाबतच चर्चा सुरु आहे. पोलिसांचा धाक राजकारणाच्या हस्तक्षेपामुळे राहिला नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. परिस्थिती अशीच राहिल्यास अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. एका बाजूला निवडणुकीचे राजकारण तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रात प्रक्षोभ निर्माण करण्याचे वातावरण हे चिंताजनक आहे. जरांगे - पाटील यांच्यापुढे राज्य सरकारने लोटांगणंच घातले असल्याचे दृश्य गेले काही दिवस दिसून येत आहे. मंत्री व नेते आपली आसने सोडून जरांगे पाटील यांच्यामागे धावत असल्याचे दृश्य गेले आठवड्याभरात दिसून येते. त्यामुळे मोठा घटक असलेला ओबीसी समाज हाही संतप्त होऊन रस्त्यावर उतरण्याची भाषा करीत आहे. राज्य सरकारच्या विरोधात विरोधकांनी दंड थोपटले आहेत.

देशात शिक्षण क्षेत्रात आज जो सावळा गोंधळ चालू आहे. त्यामुळे विद्यार्थी, तरुण मंडळी संतापली आहे. आधार म्हणून त्यांनी कॉक्रोच पाटीर्चा हात धरला तर त्यात नवल नाही. कॉक्रोच जनता पाटीर्चे मोहोळ येत आहे. तरुणांमध्ये अस्थिरता असल्याने यापैकी काही तरुण कॉक्रोच पार्टीकडे वळले आहेत. पेपर फुटीचे हे आंदोलन आज कॉक्रोच पार्टीने हाती घेतले आहे तर दुसऱ्या बाजूला शरद पवार राष्ट्रवादीचा काही संबंध नसतांना रोहित पवार हे अस्थिरता निर्माण करत असल्याचे चित्र समोर येत आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी कॉक्रोच पाटीर्ला समर्थन देण्याचे जाहीर केले. १४० कोटी भारतीय जनतेच्या पुढे २५ ते ३० लाख तरुणांचा सोशल मीडिया पॉवरफुल ठरल्याच्या आरोळ्या मारल्या जात आहेत. यापूर्वी या देशाने जनता राजवटीचा अनुभव घेतला आहे. काँग्रेसच्या विरोधात १९६६ मध्ये सर्व विरोधक एकत्र आले होते. त्यामध्ये बिहारमध्ये कपुर्री ठाकूर, मध्यप्रदेशमध्ये वीरेंद्रकुमार सकलेचा, उत्तरप्रदेशमध्ये जे बी कृपलानी यांच्या पत्नी मुख्यमंत्री झाल्या होत्या. १९७५ची आणीबाणी आजही डोळ्यसमोरून जात नाही. इंदिरा गांधींचे सरकार पाडून जनता पार्टीच्या हाती सत्ता आली होती. परंतु आपापसातील मतभेदामुळे ही जनता पार्टी लयाला गेली.

इंदिरा गांधी मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या आणि शरद पवारांचे पंतप्रधान पदाचे स्वप्न हे स्वप्नच राहिले. शरद पवारांनी तर सोनिया गांधी ह्या परदेशी आहेत म्हणून दुसरं बंड केले होते, परंतु पुढे हे बंडही टिकले नाही. आता पवारांना बुद्धी सुचली आहे की, त्यावेळी आपण सोनिया गांधींवर जे बोललो ते बोलून चूक केली. शरद पवारांचे हातपाय चालत नसतांना ते राज्यसभेची शपथ घेण्यासाठी व्हीलचेयरवरून गेले हे राज्यातील जनतेने पाहिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार कुटुंब कधीच मागे पडले नाही. एका बाजूला मराठा समाजाला पाठिंबा देऊन आर्थिक मदत करायची तर दुसऱ्या बाजूला ओबीसी घटकांना मदत करून त्यांनाही धरून ठेवण्याची कसरत त्यांनी केली. त्यातूनच शरद पवार विरुद्ध अजित पवार असा वाद झाला. पवारांचे कुरघोडीचे राजकारण आता समोर येत आहे. त्याची परिणती विधान परिषदेत दिसून आली. त्यांनी दिलेल्या उमेदवारांना रणांगणातून पळ काढावा लागला.

भारत देशावर सध्या युद्धाचे ढग दिसत असून त्यामुळे डिझेल, पेट्रोल, गॅस व त्यावर अवलंबून असणारे उद्योग डबघाईस आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यापेक्षा त्याच्यावरही वार केले जात आहेत. महाराष्ट्रात तर काल पक्षांतर करून आलेल्यांना उमेदवारी दिली जाते. हा निकषच चुकीचा आहे. अहिल्यानगरचे प्राजक्त तनपुरे काल शरद पवार गटातून महायुतीकडे आले त्यांना ४८ तासात विधान परिषदेची उमेदवारी दिली. तर इकडे राष्ट्रवादीमध्ये काकडे बंधू भाजपला सोडून अजित पवार गटात गेले. त्या काकडेंना राष्ट्रवादीची उमेदवारी दिली. मित्र पक्षच एकमेकांचे पाय ओढत असल्याचे दिसत आहे. संभाजी नगरमध्ये शिंदे यांच्या शिवसेनेला जोरदार धक्का बसला आहे. शिवसेनेचे मंत्री भाजपा नेत्यांवर आरोप करत आहेत. नुसतेच आरोप नाहीत तर बंडाची भाषा केली जात आहे. असे किती दिवस चालणार? विरोधक महायुतीमध्ये मिठाचा खडा टाकत असले तरी प्रत्यक्षात महायुतीमध्ये काही आलबेल नाही. विधान परिषद निवडणुकीत त्याची प्रचिती समोर येत आहे. तिकडे डोंबिवलीमध्ये भाजपाच्या माजी नगरसेवकांना शिवसेनेत घेतले जात आहे. महायुती म्हणून याला काही अर्थ राहिला आहे असे दिसत नाही. एकूणच राज्यात सर्वत्र कुणाचा पायपोस कुणाच्यात राहिलेला नाही असे दिसून येते. सध्या महाराष्ट्रात रोज नवीन विषय समोर येत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसरीचे सल्ले द्यावे त्यावरही राजकारण केले जात आहे. यापूर्वी काँग्रेसचे सरकार असतांना याहीपेक्षा कडक निर्बंध घातले जात होते. उदाहरण द्यायचे म्हटल्यास स्व. लाल बहादूर शास्त्री यांनी जनतेने एक दिवस बुधवारी उपवास करावा असे म्हटले होते तर भारत चीन युद्धानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशाची आर्थिक परिस्थिती बिघडल्याने हजारो क्विंटल सोन जमा केल होते. त्याचबरोबर १९७१ च्या बांगलादेश भारत युद्धात इंदिरा गांधी यांनी आवाहन केले होते त्याला जनतेने प्रतिसाद दिला होता.

सध्या देश प्रथम ही भावना पुसण्याचे राजकारण चालू आहे. यातूनच अराजकाची स्थिती निर्माण होण्याची धास्ती आहे. विविध पक्षाचे प्रवक्ते हे स्वतःच्या पक्षबद्दल काही बोलत नाहीत, मात्र देशात व जगात काय चालले आहे यावर शेरेबाजी करत आहेत. पूर्वी असे होत नव्हते. महाराष्ट्रात काँग्रेसच्या काळात विरोधक नगण्य होते, परंतु त्यांनी कधी राष्ट्रविरोधी भूमिका घेतली नाही. सध्या सोशल मीडियाला हाती धरून महाराष्ट्र पेटवण्याची भूमिका चालू आहे. हे थांबले नाही तर महाराष्ट्रात अस्थिरता माजेल.

'सीबीएसई' नापास

बारावीच्या उत्तरपत्रिका संगणकावर तपासण्याच्या पद्धतीत (ओएसएम) मोठ्या प्रमाणावर तांत्रिक चुका झाल्याप्रकरणी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (सीबीएसई) अध्यक्ष राहुल सिंह आणि सचिव हिमांशू गुप्ता यांची झालेली हकालपट्टी योग्य असली, तरी यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान भरून निघणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना चुकीचे गुण दिले गेले किंवा ज्यांच्या उत्तरपत्रिका बदलल्या गेल्या, त्या दुरुस्त होईपर्यंत विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. त्यासाठी ह्यसीबीएसईह्णने ऑनलाइन पोर्टल सुरू केले असले, तरी तिथे सायबर हल्ले झाल्याने हजारो विद्यार्थ्यांना तक्रार नोंदविता आली नाही. पारदर्शक मूल्यमापनासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात गैर काहीही नाही; परंतु सुमारे अठरा लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट जोडलेल्या बारावीच्या परीक्षेत त्याचा वापर करण्याच्या आधी प्रायोगिक पातळीवर त्याची क्षमता तपासण्याचे व्यवहारज्ञानही 'सीबीएसई'मधील दुढ्ढाचार्यांनी दाखविले नाही. नाही म्हणायला प्रायोगिक पद्धतीने संगणकावर उत्तरपत्रिका तपासण्यासाठी तीन दिवसांची कार्यशाळा जानेवारीत दिल्लीत घेतली गेली; मात्र त्यात केवळ दिल्लीचे पाच शाळांचे शिक्षक सहभागी झाले होते. परीक्षकांनी किंवा पर्यवेक्षकांनी दिलेल्या गुणांची व्यवस्थित नोंद होत नसल्याच्या, संगणक यंत्रणा मध्येच बंद पडत असल्याच्या, उत्तरपत्रिका धूसर दिसत असल्याच्या बाबी त्याच वेळी निदर्शनास आणून देण्यात आल्या होत्या. अंतिम परीक्षेत ही पद्धत यंदा वापरू नये, अधिकाधिक शिक्षकांना प्रशिक्षण देऊन, तसेच तांत्रिक अडचणी दूर करून ती पुढच्या वर्षी वापरली जावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या होत्या. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दुष्परिणाम लाखो विद्यार्थ्यांना भोगावे लागत आहेत. या सर्व परीक्षा विद्यार्थ्यांच्या, त्यांच्या पालकांच्या आणि एका अर्थाने देशातील ऊर्ध्वगामी समाजाच्या आशा-आकांक्षाशी जोडलेल्या आहेत. त्या अतिशय जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने घेण्याची गरज असताना राष्ट्रीय चाचणी संस्था (एनटीए) किंवा 'सीबीएसई' या केंद्रीय परीक्षा यंत्रणा त्याची पूर्तता करीत नसल्याचे वारंवार दिसते. असे काही घडल्याचे उघडकीस आल्यानंतरही तिथे जबाबदारीच्या पदावरील लोक आपली अकार्यक्षमता, अपयश लपवत राहतात; आणि केंद्रीय शिक्षणमंत्री 'यात राजकारण आणू नका', असे म्हणतात. ही केवळ उत्तरदायित्व झटकण्याची प्रवृत्ती म्हणावी की आणखी काही? 'सीबीएसई'च्या निकालानंतर 'ओएमएस'मधील चुका निदर्शनास आणणाऱ्या विद्यार्थ्यांना काही ट्रोलर्सनी 'पाकिस्तानी' ठरविण्याचा प्रकार म्हणजे विकृतीचा कळसच.

शेगावला जे शक्य ते त्र्यंबकेश्वरला का नाही?

त्र्यंबकेश्वर मंदिरात भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक उपाययोजना हव्या, मात्र अतितातडीच्या देणगी दर्शनाच्या नावाखाली अडीच हजार रुपये शुल्क आकारणे हाच एकमेव पर्याय असू शकतो का? लाखो भाविकांचे व्यवस्थापन, शिस्तबद्ध रांगा, पारदर्शक व्यवस्था आणि सुलभ दर्शन याचा आदर्श नमुना महाराष्ट्रातील शेगावने उभा केला आहे. त्याच महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वरमध्ये गर्दी नियंत्रणासाठी सशुल्क दर्शनाचा आधार का घ्यावा लागत आहे? शेगावला जे जमले, ते त्र्यंबकेश्वरला का जमू नये?



भारतीय संस्कृतीत मंदिर हे बाजारपेठेचे नव्हे, तर समाजाच्या आध्यात्मिक जीवनाचे केंद्र मानले गेले आहे. मंदिराच्या दारात राजा आणि रंक समान असतात, ही भावना शतकानुशतके जोपासली गेली आहे. परंतु जेव्हा दर्शनासाठी हजारो रुपयांचे शुल्क आकारले जाते, तेव्हा या समतेच्या तत्त्वालाच तडा जातो. पैसा देणार्यांसाठी देव अधिक जवळ आणि गरीबांसाठी अधिक दूर, असा संदेश अशा व्यवस्थेतून नकळत दिला जातो. देवदर्शनाचा अधिकार हा आर्थिक क्षमतेवर अवलंबून असावा का? गदीर्चे नियोजन, सुरक्षा, स्वच्छता आणि व्यवस्थापनासाठी निधी आवश्यक असतो, हेही वास्तव आहे. परंतु प्रश्न निधी उभारणीचा नाही; प्रश्न आहे त्याच्या स्वरूपाचा आणि प्रमाणाचा.

अडीच हजार रुपये ही रक्कम सामान्य कुटुंबासाठी अत्यंत मोठी आहे. चार जणांच्या कुटुंबाने अशा दर्शनाचा लाभ घ्यायचा ठरवला तर दहा हजार रुपयांचा खर्च केवळ दर्शनासाठी करावा लागेल. यामध्ये सर्वात मोठी भीती म्हणजे श्रद्धेच्या व्यापारीकरणाची. मंदिर व्यवस्थापन जर महसूल वाढविण्याच्या दृष्टीने दर्शनाच्या विविध श्रेणी निर्माण करू लागले, तर उद्या आणखी वेगवान दर्शन, अधिक जवळून दर्शन किंवा विशेष धार्मिक अनुभव यांसाठी आणखी जास्त शुल्क आकारण्याचा मार्ग खुला होऊ शकतो. यातून देवळातील सेवा आणि व्यावसायिक सेवा यांतील सीमारेषा धूसर होण्याचा धोका निर्माण होतो. हे कळत असूनही सशुल्क दर्शनाचा निर्णय पुढे रेटायचाच असेल तर, शुल्कातून मिळणार्या निधीचा उपयोग नेमका कशासाठी होणार, त्याचे लेखापरीक्षण कसे होणार, भाविकांना कोणत्या अतिरिक्त सुविधा मिळणार आणि सामान्य दर्शन व्यवस्थेवर त्याचा काय परिणाम होणार, याची स्पष्ट माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

भारताच्या राज्यघटनेतील कलम 25 हे प्रत्येक नागरिकाला धर्मस्वातंत्र्याचा आणि धार्मिक आचरणाचा अधिकार देते. अर्थात, हा अधिकार सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य यांच्या अधीन आहे. मंदिर व्यवस्थापनाला काही प्रशासकीय नियम आखण्याचा अधिकार असतो. त्यामुळे शुल्क आकारणे हे आपोआपच बेकायदेशीर ठरत नाही. परंतु जर शुल्कामुळे सामान्य भाविकांच्या दर्शनाच्या अधिकारावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मयार्दा येत असतील, तर त्याची वैधता तपासली जाणे गरजेचे आहे. मंदिर प्रशासनाच्या भूमिकेनुसार, सर्व भाविकांसाठी मोफत दर्शनाची व्यवस्था कायम असून सशुल्क दर्शन हा केवळ अतिरिक्त पर्याय आहे. याच पार्श्वभूमीवर भारतीय न्यायालयांनी अनेक वेळा स्पष्ट केले आहे की, धार्मिक संस्थांचे व्यवस्थापन आणि धार्मिक श्रद्धा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. व्यवस्थापनातील सुधारणा, रांग व्यवस्थापन किंवा सुविधा शुल्क यांना काही प्रमाणात मान्यता दिली जाऊ शकते. मात्र त्या सुविधा अशा असाव्यात की सामान्य भाविकांवर अन्याय होणार नाही. जर सामान्य दर्शनासाठी तासनतास प्रतीक्षा आणि सशुल्क दर्शनासाठी अत्यंत सुलभ प्रवेश अशी परिस्थिती निर्माण झाली, तर समानतेच्या तत्त्वाबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतात.

मद्रास उच्च न्यायालयाने अलीकडेच एका सुनावणीदरम्यान अत्यंत स्पष्ट शब्दात म्हटले की, 'देवासमोर सर्वजण समान आहेत. मग व्हीआयपी दर्शनाची गरजच काय?' न्यायालयाने नमूद केले की, मंत्री, आमदार किंवा सत्ताधारी व्यक्तींनी असा समज करून घेऊ नये की ते कधीही मंदिरात पोहोचतील आणि देव त्यांची वाट पाहत असेल. देवाच्या दरबारात कोणताही माणूस मोठा किंवा लहान नसतो. सशुल्क दर्शनातून मंदिरांना महसूल मिळतो आणि गदीर्चे व्यवस्थापन करणे सोपे जाते, असा युक्तिवाद सुनावणीदरम्यान राज्य सरकारच्या वतीने करण्यात आला. मात्र न्यायालयाने या भूमिकेकडे फारसे सकारात्मकपणे पाहिले नाही. महसूल वाढविणे हा उद्देश असू शकतो, पण त्यासाठी देवदर्शनात आर्थिक भेदभाव निर्माण होणे योग्य ठरू शकत नाही, असा सूर न्यायालयाच्या निरीक्षणातून दिसून आला. विशेष म्हणजे, न्यायालयाने चर्च आणि मशिदींचे उदाहरण देत असेही नमूद केले की, अशा प्रकारची व्हीआयपी दर्शन संस्कृती इतर अनेक धार्मिक स्थळांमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे मंदिरांमध्ये निर्माण झालेल्या या व्यवस्थेची गरज आणि औचित्य यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात.

मंदिर हे समाजाला जोडणारे स्थान असते. तिथे आर्थिक स्तरांनुसार भिंती उभ्या राहू लागल्या, तर समाजात विभागणीची भावना वाढू शकते. श्रीमंतांसाठी वेगळी रांग आणि सर्वसामान्यांसाठी वेगळी रांग अशी परिस्थिती जेव्हा उद्भवते, तेव्हा स्वाभाविकच श्रद्धा आणि भावनेला तडा जातो. मुळात प्रश्न असा आहे की, त्र्यंबकेश्वर मंदिर संस्थानाला अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची आवश्यकता नेमकी किती आहे? आणि त्या गरजेच्या नावाखाली सर्वसामान्य भाविकांना दुय्यम स्थान देणे कितपत योग्य आहे? दर बारा वर्षांनी होणाया सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे राज्य शासनाकडून या परिसराच्या विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जातो. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा, प्रकाशयोजना, घाटांचे सुशोभीकरण आणि इतर मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी सरकार सातत्याने आर्थिक मदत करत असते. त्याशिवाय ज्योतिर्लिंग म्हणून राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व लक्षात घेता विविध योजनांमधूनही निधी प्राप्त होत असतो. अशा परिस्थितीत मंदिर संस्थानाने उत्पन्न वाढविण्याच्या नावाखाली दर्शनालाच आर्थिक स्तरांमध्ये विभागणे योग्य ठरते का?

आज त्र्यंबकेश्वर, शिर्डी, तिरुपती किंवा देशातील इतर मोठ्या धार्मिक संस्थांबाबत चर्चा होत असताना शेगावच्या गजानन महाराज मंदिराचा आदर्श पुन्हा पुन्हा समोर येतो. शेगावला गेल्यावर जाणवते की, दर्शनासाठी कुठेही व्हीआयपी रांग नाही, कुठेही पैशाच्या मोबदल्यात तात्काळ दर्शन मिळत नाही, कुठल्याही राजकीय किंवा आर्थिक प्रतिष्ठेमुळे सामान्य भाविकांपेक्षा वेगळा मार्ग उपलब्ध होत नाही. तरीसुद्धा दररोज हजारो आणि विशेष दिवसांमध्ये लाखो भाविक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेतात आणि समाधानाने परततात. शेगाव संस्थानची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांनी भक्ताला ग्राहक मानले नाही, तर अतिथी मानले. अनेक ठिकाणी भाविक हा गर्दी व्यवस्थापनाचा प्रश्न असतो; शेगावमध्ये भाविक हा व्यवस्थापनाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे येथे उभी राहिलेली प्रत्येक व्यवस्था, प्रत्येक नियम आणि प्रत्येक सुविधा भाविकाचा अनुभव सुलभ करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. मंदिर परिसरात अनावश्यक गोंधळ, धक्काबुक्की किंवा दिशाहीन गर्दी दिसत नाही.

प्रत्येक गोष्ट नियोजनबद्ध आहे. भाविकांचा प्रवाह कोणत्या दिशेने जाईल, कुठे थांबेल, कुठे विश्रांती घेईल, कुठे पिण्याचे पाणी मिळेल, कुठे प्रसाद मिळेल आणि दर्शनानंतर बाहेर कसे पडेल याचा अत्यंत बारकाईने विचार करण्यात आलेला आहे. व्यवस्थापनशास्त्रात याला 'फ्लो मॅनेजमेंट' म्हटले जाते. अनेक मंदिरांमध्ये रांग म्हणजे अस्वस्थता, उकाडा, गोंधळ आणि प्रतीक्षेचा त्रास. परंतु शेगावमध्ये रांग ही शिक्षा वाटत नाही. ती भक्तीचा एक भाग बनवली गेली आहे. प्रशस्त मार्ग, स्वच्छ परिसर, योग्य हवेशीर व्यवस्था, बसण्याची सुविधा आणि सातत्याने केले जाणारे मार्गदर्शन यामुळे भाविकांचा मानसिक ताण कमी होतो. भाविकांशी नम्रपणे बोलणे, त्यांना मार्गदर्शन करणे, वृद्ध आणि दिव्यांगांना मदत करणे, स्वच्छतेकडे लक्ष देणे आणि कोणतीही समस्या उद्भवण्यापूर्वी ती सोडवणे या गोष्टी व्यवस्थापनाच्या डीएनएमध्ये रुजलेल्या आहेत. म्हणूनच येथे नियम कडक असले तरी ते त्रासदायक वाटत नाहीत. शेगावमध्ये देणगी ही स्वेच्छेची आहे. दर्शन आणि पैशाचा संबंध जोडला गेलेला नाही. यामुळे भाविकांच्या मनात समानतेची भावना निर्माण होते.

मंदिरात प्रवेश करताना कोट्यधीश उद्योगपती आणि सामान्य शेतकरी या दोघांची रांग एकच असते. आज अनेक व्यवस्थापन तज्ञ शेगाव मॉडेलकडे अभ्यासाच्या दृष्टीने पाहतात. या सर्वांच्या मुळाशी ए

आरोग्यासाठी नुकसानदायी ठरु शकतात तुमची लांब नखे



कॅरोटिनपासून बनतात नखे - नखे शरीरात असणाऱ्या कॅरोटिन नावाच्या घटकापासून बनलेले असतात. ज्या वेळी शरीरात य घटकाची कमतरता असते तेव्हा नखांच्या पृष्ठभागावर याचा परिणाम होण्यास सुरुवात होते. यामुळे नखांचा रंग बदलतो, जो कधी कधी गंभीर आजाराचादेखील संकेत देतो.

होऊ शकतो संसर्ग - जर तुमची नखे लांब असतील आणि तुम्ही दिवसभरात बरेचदा स्वच्छ करत असाल तरीही संसर्ग होण्याची शक्यता असतेच. लांब नखांमध्ये पिनवर्म्स जमा होऊ शकतात. शिवाय त्यात जास्त घाण आणि बॅक्टेरिया असतात. त्यामुळे संसर्ग निर्माण होऊ शकतो.

उलट्या आणि अतिसार - नखांमध्ये आढळणारे बॅक्टेरिया अन्नाद्वारे पोटात जातात, ज्यामुळे उलट्या आणि अतिसार होऊ शकतो. जर तुम्हाला नखे कुरतडण्याची सवय असेल तर त्यामागील कारणे ओळखा. कित्येकदा असे कॅल्शियमच्या कमतरतेमुळे होऊ शकते.

गरोदरपणात लक्ष द्या - गरोदरपणात नखे खूप वेगाने वाढतात, परंतु यादरम्यान नखे पातळ आणि नाजूक होतात. जे कोणत्याही वस्तूंमध्ये अडकू शकतात. नखे जास्त लांब ठेवू नका नाहीतर आई आणि गर्भात वाढणाऱ्या बाळालाही नुकसान होऊ शकते.

कडधान्यामुळे होतात विविध अनेक प्रकारचे आरोग्य लाभ



कडधान्ये आपल्या आहारात महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, आजच्या धकाधकीच्या काळात घरातूनच काय तर हॉटेलमधूनही कडधान्याची हकालपट्टी झाली आहे. यांच्या अभावामुळे मानवाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसत आहे. कडधान्ये जास्त शिजविल्यानंतरही त्याच्यातील पोषक द्रव्ये कायम राहतात. तसेच त्यात भरपूर जीवनसत्वेही असतात. जाणून घेऊया कडधान्याचे फायदे...

तूरडाळ : यात खनिज, कार्बोहायड्रेट, लोहयुक्त खनिज, कॅल्शियम यांचे योग्य प्रमाण असते. तूर डाळ पचण्यास सोपी जाते. लहान बाळांना तूरडाळीचे पाणी पिण्यास देतात. तसेच आजारी व्यक्तीस तूरडाळीची खिचडी खाण्यास देतात. मात्र, दमा व वाताचे आजार असणाऱ्या व्यक्तींना तूरडाळीपासून त्रास होतो.

मूग : शिजवलेल्या किंवा भिजवलेल्या मुगामध्ये भरपूर पोषक द्रव्ये असतात. ते मानवास आरोग्यासाठी फायद्याचे असातात. कोंब आलेल्या मुगामध्ये कॅल्शियम, लोहयुक्त खनिज, प्रोटीन, कार्बोहायड्रेट आणि व्हिटॅमिन्स यांचे प्रमाण अधिक असते. ताप व खोकला असलेल्याा व्यक्तीसाठी मूग लाभदायी आहे.

हरभरे : हरभरे व हरभऱ्याची डाळ आपल्या आरोग्यासोबतच सौंदर्यासाठीही उत्तम आहे. यात कार्बोहायड्रेट, प्रोटीन, कॅल्शियम, लोहयुक्त खनिज व व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात असतात. रक्तदाब, खोकला व कावीळ या आजारावर लाभदायी असून याच्या डाळीचे पीठ केस व त्वचेच्या सौंदर्यासाठी गुणकारी असते.

उडीद : उडदाची डाळ शरीरासाठी शीत असते. मानवी आहारात तिचा उपयोग करतेवेळी शुद्ध तुपात हिंग टाकून त्याची वाफ द्यावी. यातही कार्बोहायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीन भरपूर प्रमाणात आढळतात. मुळव्याध, दमा, पक्षाघात आदी आजार असलेल्यांनी त्यांच्या आहारात उडीद डाळीचा जास्त वापर केला पाहिजे.

मटकी : मटकी व त्याची डाळ कार्बोहायड्रेट, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम व प्रोटीनयुक्त असल्याने कृष्ठरोग व विषमज्वरनाशक असते.

मसूर : मसूर डाळीचा उपयोग रक्तशुद्धी तसेच रक्तवाढीसाठी होतो. जुलाब, खोकला आणि अपचन यावरही मसूरची डाळ लाभदायी असते.

डायबेटिस नियंत्रणात राखण्यासाठी करा ही पाच योगासनं!

भारतात मधुमेहाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. मधुमेहात शरीरातील साखरेचं प्रमाण वाढतं. शारीरिक मेहनत न करणं, बदलती जीवनशैली आणि खाण्या पिण्याच्या वेळा न पाळणं... अशा अनेक कारणांमुळे मधुमेह हा आजार होऊ शकतो. मधुमेह हा आजार पूर्णपणे कधी जात नाही. मात्र खाण्यावर नियंत्रण आणि गोळ्यांच्या मदतीने यावर नियंत्रण मिळवता येऊ शकते. याशिवाय योगच्या माध्यमातूनही मधुमेह नियंत्रणात ठेवता येतो.

धनुरासन- या योगप्रकारात शरीराला धनुष्याप्रमाणे मोडायचं असतं. या आसनाला मधुमेहाच्या रुग्णांसाठी वरदान म्हटलं जातं. यामुळे ओटीपोटाचे स्नायू मजबूत होतात. जर तुम्हाला थकवा जाणवत असेल तर हे आसन तुमच्यासाठी फार फायदेशीर आहे.

चिमोत्तानासन- या योगसाधनेत दोन्ही पायात अंतर ठेवून समोरच्या बाजूला झुकायचे असते. यामुळे पोटावर ताण तयार होतो. ज्यामुळए शरीराची पाचनक्रिया चांगली होते आणि मेंदू शांत होतो.

अर्ध्य मत्स्येंद्रासन- या योगासनावेळी मणक्याचे हाड फिरते, ज्यामुळे पोटाचाही चांगला व्यायाम होतो. या योगासनावेळी फुफ्फुसांनाही भरपूर ऑक्सीजन मिळतो. फक्त मणक्याच्या हाडालाच नाही तर संपूर्ण शरीरातील रक्तप्रवाह ठीक होतो.

कपालभाती- हे योगासन केल्याने आपल्या मज्जासंस्था आणि मेंदूचे तंतू पुनरुज्जीवित होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे फार फायदेशीर आहे. यामुळे शरीरातील रक्तप्रवाह ठीक होतो आणि शरीरातील इन्सूलिन तयार होण्याची प्रक्रिया ठीक होते आणि मधुमेह नियंत्रणात राहतो.

सुप्त मत्स्येंद्रासन- या योगासनामुळे शरीराचे अवयव सक्रिय होतात. या योगासनावेळी तुमच्या पोटाच्या भागावर ताण येतो. या आसनामुळे पचनक्रिया सुधारते आणि याचा मधुमेहाच्या रोगांना फायदा होतो.

टीप- या लेखात दिलेली माहिती आणि सुचना ही सर्वसामान्य माहितीवर आधारित आहे.

तवा सब्झी



साहीत्य :
◆१०० ग्राम पनीर, ◆१ मोठा बटाटा, ◆२ कांदे, ◆१०-१२ फ्लॉवरचे तुरे,◆१०-१२ भेंडी, ◆४-५ मश्रुम्स, ◆१ भोपळी मिरची, ◆तळण्यासाठी तेल, ◆६ टॉमेटो, ◆२ टेस्पून लोणी, ◆२ टेस्पून तेल, ◆२ टेस्पून लसूण, बारीक चिरलेली, ◆१ टेस्पून आले, ◆५-६ बदामाची पूड, ◆१ टिस्पून गरम मसाला, ◆दीड टिस्पून धणेपूड, ◆१/२ टिस्पून जिरेपूड, ◆१/२ टिस्पून आमचूर पावडर, ◆१ टिस्पून लाल तिखट, ◆१ टिस्पून कसुरी मेथी, ◆३ टेस्पून फेटलेली साय, ◆चवीपुरते मिठ, ◆चवीपुरती साखर

कृती :
◆बटाटा सोलून मध्यम चौकोनी तुकडे करावेत. कांद्याच्या मोठ्या फोडी कराव्यात. भेंडीचे देठ कापून टाकावे. भोपळी मिरचीचे मोठे तुकडे करावेत. पनीरचे मध्यम तुकडे करावेत. मश्रुम्सच्या दांड्या काढून टाकाव्यात. ◆एका वाटीत गरम मसाला, धनेजीरे पूड, आमचूर पावडर एकत्र करावी. ◆कढईत तेल गरम करावे. त्यात मध्यम आचेवर चिरलेल्या भाज्या वेगवेगळ्या तळून घ्याव्यात. कागदावर काढून अधिकचे तेल काढून टाकावे. प्रत्येक भाजीवर चिमटी-चिमटी मसाल्याचे मिश्रण पेरावे आणि मिक्स करावे. पनीर ताजे असल्यास तसेच वापरावे किंवा शालो फ्राय करावे. ◆टॉमेटो उकडून मिक्सरमध्ये बारीक प्युरी करावी. साले व बिया काढण्यासाठी चाळणीवर चाळून घ्यावे. थोडे पाणी घालावे. ◆कढई गरम करून त्यात २ टेस्पून तेल आणि बटर घालावे. त्यात आलेलसूण परतून घ्यावी. त्यात टॉमेटो प्युरी घालून २-४ मिनिटे उकळू द्यावी. लागल्यास थोडे पाणी घालावे. नंतर त्यात बदामाची पूड, उरलेले मसाला मिश्रण, लाल तिखट, कसूरी मेथी, साय, थोडीशी साखर आणि मिठ घालावे. ग्रेव्हीला तेल सुटले पाहिजे. ◆तवा सब्झी बनवताना आवडेल त्या भाज्या तव्यावर घालाव्यात. त्यात २-४ टेस्पून ग्रेव्ही घालून परतावे. वाटल्यास थोडा गरम मसाला आणि धणेपूड घालू शकतो ज्यामुळे अधिक स्वादिष्ट लागेल.

अंधश्रद्धा म्हणून नाही तर या कारणांसाठी घातला जातो काळा दोरा



तुम्हाला हातात, गळ्यात किंवा पायात काळा दोरा अनेक जण घालतात. या मागे काही तरी अंधश्रद्धा असते हे आपल्या सगळ्यांनाच माहीत आहे. सर्वसाधारणपणे नजर लागू नये म्हणून काळा दोरा घालण्याचा सल्ला दिला जातो. पण अंधश्रद्धा म्हणून नाही तर काळा दोरा घालण्यामागे वैज्ञानिक कारणं आहेत. जर तुम्हालाही कोणी काळा दोरा बांधण्यास सांगितला असेल तर त्यामागे अंधश्रद्धाच नाही तर हे कारण असू शकते.

काळा रंग मानला जातो अशुभ

कोणत्याही शुभ प्रसंगी काळ्या रंगाचे कपडे घातल्यानंतर लोकं तुमच्याकडे संशयाच्या नजरेने पाहतात. कारण कोणत्याही चांगल्या कार्यक्रमात काळा रंग हा अशुभ मानला जातो पण ज्यावेळी तुम्हाला कोणाची नजर लागत असेल तर मात्र तुम्हाला काजळाचा काळा टिक्का लावला जातो. त्यामुळे काही अंशी काळा रंग हा शुभ आहे आणि काशी अंशी काळा रंग अशुभ

काळा रंग म्हणून फायदेशीर

काळा रंग हा नेहमीच आपली नजर आकृष्ट करुन घेत असतो. जर तुम्ही काळ्या रंगाचे कपडे घातले असतील तर लोक तुमच्याकडे एकदा तरी बघतातच. अशावेळी त्यांच्या नजरेत जर नकारात्मक उर्जा असेल तर ती परतून लावली जाते. त्यामुळेच काळा रंग परिधान करा किंवा काळा रंग तुमच्याजवळ असू द्या असे म्हणतात. आपले शरीर पंच तत्वांनी बनलेले आहेच. पृथ्वी, वायू, अग्नी, जल आणि आकाश या सगळ्यापासून शरीराला मिळणारी उर्जा अत्यंत लाभदायक असते. जर नकारात्मक उर्जा तुमच्यावर प्रहार करत असेल तर मात्र काळा रंग त्याच्यासमोर बाधा आणत उर्जा टिकवून ठेवतो असे म्हणतात.

असे होतात काळ्या दोऱ्याचे फायदे

पोटदुखी कमी करण्यासाठी: काहींना काहीही कारण नसताना अचानक पोटदुखीचा त्रास होतो. पोटात कडमडून दुखू लागते. अशावेळी तुम्ही तुमच्या पायांच्या दोन्ही अंगठ्याना काळा दोरा बांधायला हवा. तुम्हाला आराम पडलेला त्वरीत जाणवेल.

पैशासंबधीच्या समस्या करते दूर: आता हा मानो या ना मानो संदर्भातील इलाज आहे. असे म्हणतात जर तुम्हाला पैशांसंदर्भातील काही तक्रारी असतील तर तुम्ही तुमच्या पायांना काळा दोरा बांधायला हवा.तुमच्या पायांना काळा दोरा बांधल्याने तुमच्या पैशांसदर्भातील अनेक तक्राकी दूर होतात. तुमच्याकडील पैसा टिकून राहण्यास मदत होते.

पायदुखी होते कमी: अनेकदा काहींना पाय दुखीचा त्रास असतो. सांधेदुखी किंवा तत्सम आजारांनी अनेक जण त्रस्त असतात अशांनी पायदुखी कमी करण्यासाठी डाव्या पायात काळ्या रंगाचा दोरा घालावा आराम पडतो. शिवाय जर तुमचे काम दिवसभर काम उभ्याने असेल तर तुम्ही काळ्या रंगाचा दोरा घातला तरी चालू शकेल तुम्हाला त्रास होणार नाही.

काळ्या रंगाच्या दोऱ्याचे फायदे पाहता जर तुमच्याही मनात शंका असेल तर तुम्ही अंधश्रद्धा म्हणून नाही तर वैज्ञानिक कारणं समजून घेत हा दोरा बांधावा.



दररोज दोन चमचे कांद्याचा रस घेऊन ९ समस्या वर करा मात



आजकालच्या जमान्यात आणि तरुणांना व तरुणींना खूप मोठ्या समस्यांना सामना करावा लागत आहे. यावर डॉक्टरला दाखवण्यापेक्षा घरगुती उपाय देखील तुम्ही करू शकता. रोज दोन चमचे कांद्याचा रस घेतल्याने तुम्ही वेगवेगळ्या नऊ समस्यावर मात करू शकता. कांद्याच्या रसामध्ये व्हिटॅमिन ए, बी ६ डी आणि सोबतच सल्फर, क्रोमियम, सोडियम, पोटॅशियम असतात. यामुळे दररोज कांद्याचा रस घेतल्याने तुम्हाला अनेक फायदे होऊ शकतात. कुठले फायदे होतात ते आपण जाणून घेऊया.

१. डोकेदुखी : जर तुम्हाला डोकेदुखीची समस्या असेल तर तुम्ही दररोज दोन चमचे कांद्याचा रस आणि एक चमचा साखर अर्धा कप पाण्यात मिसळून घेतल्याने तुमची डोकेदुखी थांबते.

२. पुरुषातील कमजोरी : जर पुरुषांना कमजोरी असेल किंवा त्यांना काम क्रीडा करताना अशक्तपणा जाणवत असेल तर त्यावर कांदा हा रामबाण उपाय आहे. दररोज दोन चमचे कांद्याचा रस ३ चमचे मध रोज सकाळ-संध्याकाळ त्याने पुरुषाची कमजोरी दूर होते.

३. पाळीचा महिलांचा मासिक त्रास : जर महिला आणि तरुणींना मासिक पाळीचा त्रास होत असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रसासोबत घेतल्याने मासिक पाळीचा त्रास कमी होऊन स्त्रियांची कमजोरी कमी होऊ शकते.

४. लघवीची समस्या : जर स्त्री आणि पुरुषांना लघवीची खूप मोठी समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रस ३ या सोबत घेतल्याने युरिनच्या समस्येवर फायदा होऊ शकतो. असा प्रयोग दररोज करावा.

५. कोंडा : तरुणी किंवा पुरुषांना केसांमध्ये कोंड्याची समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याचा रस अर्धा वाटी दह्यामध्ये मिसळून केसांवर लावल्याने कोंडा मोठ्या प्रमाणात दूर होतो.

६. मुतखडा: जर तुम्हाला मुतखड्या संबंधित समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याच्या रसात एक चमचा साखर मिसळून घेतल्याने तुम्हाला तातडीने मुतखड्या पासून मुक्तता मिळू शकते.

७. टकले पणा: आज-काल तरुणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात टकलेपणाची समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या दूर करण्यासाठी दररोज दोन चमचे कांद्याचा रस दोन चमचे मध मिसळून मसाज केल्याने केस गळती कमी होते. पयार्याने केस गळती थांबते.

८. अपचन: आजकाल बाहेरचे खाल्ल्याने खूप मोठ्या प्रमाणात अपचनाची समस्या निर्माण झालेली आहे. त्यासाठी अपचन दूर करण्यासाठी दररोज दोन चमचे कांद्याचा रस, हिंग आणि काळे मीठ मिसळून घेतल्यास पोटातील गॅस ची समस्याही कमी होते.

९. खाज: जर तुम्हाला खाजी संबंधी काही समस्या असेल तर दररोज दोन चमचे कांद्याच्या रसामध्ये हळद मिसळून लावल्याने त्वचा संबंधी आजारात फायदा होतो.

रिकाम्या पोटी लसूण खाण्याचे फायदे



सर्वसाधारणपणे लसणीचा उपयोग भाजीला फोडणी देण्यासाठी, एखाद्या भाजीची ग्रेव्ही तयार करण्यासाठी, किंवा चटण्या बनविण्यासाठी केला जातो. एखादी बेचव भाजी केवळ लसूण त्यामध्ये घातल्याने किती चविष्ट बनते ! पण केवळ खाद्यपदार्थांची चव वाढविण्याखेरीज ही लसूण अजून किती तरी प्रकारे उपयोगाला येते. लसणीमध्ये अशी अनेक गुणकारी तत्वे आहेत, ज्यामुळे आपला अनेक विकारांपासून बचाव होऊ शकतो. आयुवेर्दामध्ये लसणीला ह्य वंडर फूड ह्य म्हटले गेले असून, लसणीचा उपयोग औषधी म्हणून केला गेला आहे. त्यामुळे आपण आपल्या आहारात लसणीचा समावेश करणे अगत्याचे आहे. पण या औषधीचा सर्वात जास्त उपयोग सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी खाल्ल्याने होतो. त्यामुळे दररोज सकाळी उठल्यानंतर एक लसणीची पाकळी चावून खावी व त्यानंतर एक ग्लास कोमट पाणी प्यावे. जर लसूण चावून खाणे शक्य नसेल, तर लसणीची पाकळी गरम पाण्याबरोबर गिळून टाकावी. लसूण हृदयरोगाशी संबंधित तक्रारी दूर करण्यास मदत करते. लसूण खाल्ल्याने रक्ताच्या गाठी बनत नाहीत. तसेच हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता ही कमी होते. लसूण आणि मध मिसळून खाल्ल्यास हृदयाच्या धमन्यांमध्ये असलेले ब्लॉकेज दूर होते, त्यामुळे हृदयाचा रक्तप्रवाह सुरळीत सुरु राहतो. लसूण खाल्ल्याने उच्चरक्तदाब असल्यास तो नियंत्रित ठेवणे शक्य होते. लसणीच्या सेवनाने शरीरातील रक्ताभिसरण चांगले राहते. डायरिया किंवा बद्धकोष्ठ या पोटाच्या दोन्ही विकारांमध्ये लसूण उपयोगी आहे. यासाठी थोडे पाणी उकळायला ठेऊन त्यामध्ये पाच-सहा लसणीच्या पाकळ्या घालाव्यात. पाणी साधारण सात-आठ मिनिटे उकळून घ्यावे. त्यांनतर हे पाणी थोडे निवले, की मग हे पाणी प्यावे. या लसणीच्या पाण्यामुळे जुलाब आणि बद्धकोष्ठ या दोन्ही विकारांमध्ये आराम मिळतो. तसेच शरीरामधील घातक पदार्थ देखील लसणीच्या पाण्याच्या सेवनाने बाहेर टाकले जातात. तसेच लसणीच्या सेवनाने पाचनशक्ती देखील चांगली राहते. ज्यांना अपचनाचा त्रास होत असेल, किंवा ज्यांना काही कारणाने भूक कमी लागत असेल, त्यांनी सकाळी रिकम्या पोटी लसूण चावून खावी. लसणीचा सेवनाने ॲसिडीटीपासून ही आराम मिळतो.लसणीमध्ये अँटी बॅक्टेरियल व वेदना कमी करणारी तत्वे आहेत. त्यामुळे इन्फेक्शन झाल्याने जर दातदुखी सतावत असेल, तर लसणीची एक पाकळी ठेचून जो दात दुखत असेल, तिथे ठेवावी. या उपायाने दात दुखी कमी होण्यास मदत होते. श्वासनाशी संबंधित विकारांमध्ये ही लसणीच्या सेवनाने फायदा होतो. सर्दी-पडसे, खोकला, अस्थमा, निमोनिया, ब्रॉन्कायटीस, इत्यादी विकारांमध्ये लसणीचे सेवन फायदेशीर ठरते.

मश्रुममध्ये लपले आहे पोषणाचा खजिना, जाणून घ्या याचे फायदे



जर भाज्यांची गोष्ट करण्यात आली तर मश्रुम फारच लोकप्रिय भाजी आहे, जी मुलांपासून वृद्धांच्या आवडीची भाजी आहे. यात इतर भाज्यांच्या तुलनेत अधिक पोषक तत्त्व आढळून आले आहे. मश्रुममध्ये लाइसिन नावाचा अमीनो आम्ल अधिक मात्रेत असत, जेव्हा की गहू, तांदूळ इत्यादी धान्यात याची मात्रा फारच कमी असते. हा अमीनो आम्ल मनुष्याला संतुलित भोजनासाठी आवश्यक असतो. मश्रुममध्ये उपस्थित एंटी ऑक्सीडेंट आमचा फ्री रेडिकल्सपासून बचाव करतो. हे एक प्राकृतिक एंटीबायोटिक आहे, जे माइक्रोबियल आणि इतर फंगल संक्रमणाला ठीक करतो.

मश्रुमचे फायदे

१. हे ब्लड प्रेशर सारख्या आजारांना नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. जे लोक या आजारांपासून त्रस्त आहे, त्यांना मश्रुमचे सेवन आवश्यक करायला पाहिजे.

२. काबोर्हाइड्रेटची पर्याप्त मात्रा असल्यामुळे हे कब्ज, अपचन, अती अम्लीयतासमेत पोटाच्या विभिन्न विकारांना दूर करतो, तसेच शरीरात कोलेस्टरॉल आणि शर्कराच्या अवशोषणाला कमी करतो.

३. मधुमेहाच्या रुग्णांना जे काही हवे असते ते सर्व मश्रुममध्ये उपस्थित आहे. यात व्हिटॅमिन, मिनरल आणि फायबर असत. यात फॅट, काबोर्हाइड्रेट आणि शुगर देखील राहत नाही, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी जीव घेण्यासारखे आहे. हे शरीरात इन्सुलिनचे निर्माण करतो.

४. यात लीन प्रोटीन असत, जे वजन कमी करण्यास मदतगार ठरत. लठ्ठपणा कमी करणाऱ्यांना प्रोटीन डायटवर कंट्रोल करण्यास सांगण्यात येत, ज्यासाठी मश्रुम सर्वात उत्तम पर्याय आहे.

५. यात सोडियम सॉल्ट देखील नसतो, ज्यामुळे लठ्ठपणा, किडनी व हृदयघात रुग्णांसाठी आदर्श आहार आहे. हृदय रोग्यांसाठी कोलेस्टरॉल, वसा आणि सोडियम सॉल्ट सर्वात जास्त हानिकारक पदार्थ असतात.

६. मश्रुममध्ये लोह घटक तसे तर कमी मात्रेत असतात, पण उपस्थित असल्यामुळे रक्ताला हिमोग्लोबिनची पातळी कायम राखतो. यात बहुमूल्य फॉलिक एसिडची उपलब्धता असते, जी फक्त मांसाहारी खाद्य पदार्थांपासून प्राप्त होते. लोह घटक आणि फॉलिक एसिडमुळे हे रक्ताचा अभाव असर्णाया ग्रामीण महिला आणि मुलांसाठी सर्वोत्तम आहार आहे.

रिकाम्यापोटी एक्सरसाइज करताय? जाणून घ्या फायदे आणि तोटे!

फिटनेससाठी जिममध्ये जाणं कोणतीही नवीन गोष्ट नाही. परंतु याबाबत अनेक प्रश्न आपल्यापैकी प्रत्येकाच्याच मनात येतात. त्यातील एक कॉमन प्रश्न म्हणजे, अनोशापोटी किंवा रिकाम्यापोटी एक्सरसाइज करावी की नाही? आज तुमच्या याच प्रश्नाचं उत्तर आम्ही तुम्हाला देणर आहोत. जाणून घेऊया अनोशापोटी एक्सरसाइज केल्याने होणारे फायदे आणि नुकसान या दोन्ही गोष्टींबाबत...

रिकाम्यापोटी एक्सरसाइज करण्याचे फायदे

काहीही न खाता एक्सरसाइज करण्याचे काही फायदे आहेत. जे शरीराला वेगवेगळ्या प्रकारे लाभदायक ठरू शकतं.

१. फॅट लवकर बर्न करण्यासाठी होते मदत

रिकाम्यापोटी व्यायाम केल्याने शरीरामध्ये असणारे फॅट्स लवकर बर्न होण्यासाठी मदत होते. अने तज्ज्ञांच्या मते, यादरम्यान आपल्या शरीराला एनजीर्ची गरज असते. अशावेळी शरीर फॅट्स बर्न करून एनर्जी प्रोड्यूस करतं.

पचनक्रिया सुधारते

रिकाम्यापोटी एक्सरसाइज केल्याने शरीराची पचनशक्ती वाढण्यास मदत होते. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, फास्टिंग दरम्यान वर्कआउट केल्याने वजन कमी होतं आणि पोटाच्या समस्या दूर होतात.

३. शरीराची ऊर्जा वाढवतं

अनोशापोटी व्यायाम केल्याने शरीरातील फॅट्स वेगाने बर्न होण्यास मदत होते. एवढचं नाही तर शरीर लो ब्लड लेव्हलमध्ये काम करण्यासाठी तयार होतं. यामुळे तुमची वर्कआउट करण्याची क्षमता वाढते.

४. डोकं शांत राहतं

काहीही न खाता वर्कआउट केल्याने शरीरामध्ये ग्लूकोज कमी होतं. याची कमतरता भरून काढण्यासाठी शरीर Hypoglycemia प्रोड्यूस करतं. जे मेंदूसाठी फायदेशीर ठरतं.

रिकाम्यापोटी व्यायाम केल्याने होणारं नुकसान

ज्याप्रमाणे रिकाम्यापोटी व्यायाम करण्याचे फायदे आहेत. त्याचप्रमाणे असं करण्याचे काही तोटेही आहेत.

१. वर्कआउट करण्याची क्षमता कमी होते

अनोशापोटी वर्कआउट केल्याने शरीरामध्ये ग्लूकोजचे प्रमाण कमी होते. यानंतर शरीरकडे फॅट्स बर्न करून ऊर्जा प्रोड्यूस करण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहत नाही. त्यामुळे याचा वर्कआउट करण्याच्या क्षमतेवरही परिणाम होतो. परिणामी तुम्हाला लगेच थकवा जाणवतो.

२.Muscles कमी होतात

बरेच दिवस अनोशापोटी व्यायाम केल्याने तुमच्या Muscles कमी होतात. त्यामुळे अनेकदा तज्ज्ञ यापासून बचाव करण्यासाठी एक्सरसाइज करण्याआधी 30 मिनिटं आधी प्रोटीन खाण्याचा सल्ला देतात.

३. After burnची समस्या होऊ शकते

काहीही न खाता वर्कआउट केल्याने After burn ची समस्या होऊ शकते. अशा परिस्थितीमध्ये शरीर एक्सरसाइजनंतरही अधिक कॅलरी बर्न करू लागतं आणि ऑक्सिजनची कमतरता जाणवू लागते.

मुंबईत बेस्ट बसचा पुन्हा थरार

कांदिवलीत दोघांना चिरडले... प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या बेस्ट बसच्या अपघातांची मालिका थांबता थांबत नाहीये. दादर येथील बस अपघाताची घटना ताजी असतानाच, आता कांदिवली परिसरात सोमवारी सकाळी भीषण दुर्घटना घडली आहे. भरधाव बेस्ट बसने रस्ता ओलांडणाऱ्या एका तरुण आणि तरुणीला जोरदार धडक दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

नेमकी घटना काय ?

सोमवारी सकाळी ११:४० च्या सुमारास ही दुर्घटना घडली. गोराई डेपोतून सुटलेली एक इलेक्ट्रिक बेस्ट बस पोयसर डेपोजवळून जात होती. त्याच वेळी आदर्श हिरालाल यादव (२४) आणि सोनम मौर्य (२४) हे दोघे रस्ता ओलांडत होते. भरधाव वेगात असलेल्या बसने या दोघांनाही जोरदार धडक दिली. ही संपूर्ण घटना परिसरातील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचे फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. अपघाताचा भीषणपणा पाहून नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

तरुणीची प्रकृती चिंताजनक

अपघातानंतर बस कंडक्टरने तातडीने दोघांनाही जवळच्या शताब्दी रुग्णालयात दाखल केले. या अपघातात सोनम मौर्य हिच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली असून, तिची प्रकृती चिंताजनक आहे. तिला आयसीयूमध्ये हलवण्यात आले असून ती मृत्यूशी झुंज देत आहे. तर आदर्श यादव याच्या खांद्याला आणि डोळ्याच्या जवळ किरकोळ दुखापत झाली आहे.

पोलीस तपास सुरू

कांदिवली पोलिसांनी या अपघाताची गंभीर दखल घेतली आहे. घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले असून, बस चालकाच्या बेदरकारपणामुळे हा अपघात झाला का, या दिशेने तपास सुरू आहे.



बेस्टच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

एकाच दिवसात मुंबईत बेस्ट बसच्या दोन मोठ्या अपघातांच्या घटना घडल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. बेस्टच्या बसेसच्या वेगावर नियंत्रण मिळवण्यात प्रशासनाला अपयश येत आहे का, असा सवाल आता मुंबईकर उपस्थित करत आहेत. मुंबईकरांच्या सुरक्षिततेसाठी बेस्ट प्रशासनाने कडक पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.

ब्रेक फेल झाले, टिळक ब्रिजच्या उतारावर वेग कमी करता आला नाही

म्हणून मी... प्लाझा बेस्ट बस अपघातातील चालकाचा जबाब

मुंबई : दादरच्या प्लाझा चित्रपटगृहाजवळ सोमवारी सकाळी इलेक्ट्रिक वातानुकूलित बेस्ट बसचा भीषण अपघात होऊन एकाचा मृत्यू, तर सहा जण जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त बस ऑलेक्ट्रा कंपनीची होती. अपघातानंतर बेस्ट बसचालकाने पोलिसांना दिलेल्या जबाबात ब्रेक फेल झाल्याचे कारण दिले होते. यानंतर खबरदारी म्हणून बेस्ट उपक्रमाने संबंधित कंपनीला बसगाड्यांमधील ब्रेकतपासणीचे निर्देश दिले आहेत. याशिवाय ताफ्यातील अन्य बसगाड्यांमधील यंत्रणाही तपासण्यात येणार आहेत.

'अपघात टाळण्यासाठी शक्य ते केले'

काळाकिल्ला आगारातील ह्यऑलेक्ट्राह्णची बस क्रमांक ७११ धारावी आगारातून वीर कोतवाल उद्यानदरम्यान धावत होती. सकाळी सुमारे ९.३० वाजता ही बस वीर कोतवाल उद्यानाजवळच्या थांब्यावरून धारावी आगाराकडे जात असताना प्लाझाजवळ हा भीषण अपघात झाला. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेतल्यानंतर, ह्यब्रेक फेल झाल्याने टिळक पुलाच्या उतारावर वाढलेला वेग कमी करणे अशक्य झाले. त्यामुळे जीवितहानी टाळण्यासाठी जे शक्य होते ते केलेह्ण, असा दावा त्याने जबाबात केला. त्यानंतर बेस्ट उपक्रमाने खबरदारी म्हणून अपघातग्रस्त बसच्या कंपनीसोबत चर्चा करून त्यांना ताफ्यातील एसी, नॉन एसी बसमधील ब्रेकयंत्रणा तपासण्याचे निर्देश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. ज्या बसचा अपघात झाला ती मिडी एसी इलेक्ट्रिक बस होती. कंपनीकडे तशा २० एसी आणि २० नॉन एसी बस आहेत. त्यांच्या ब्रेकसह अन्य यंत्रणा तपासून त्याचा अहवाल बेस्ट उपक्रमाकडे सादर केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. बेस्टकडे सध्या दोन हजार ७०० बस आहेत. यामध्ये उपक्रमाच्या २४९, तर उर्वरित भाडेतत्त्वावर सेवा पुरवणाऱ्या सहा कंपन्यांच्या बस आहेत. त्यामुळे या बसगाड्यांचीही तपासणी होणार आहे. आगारपातळीवर तशा सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिकेची ५०० कोटींची मदत

बेस्ट कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी आणि त्यावरील उपाययोजनांबाबत बेस्ट समिती अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीसोबत महत्त्वपूर्ण बैठक झाली. यात निवृत्त कर्मचाऱ्यांच्या अंतिम देयकांपासून ते कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि बसतपासणीपर्यंत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांतील निधीची उपलब्धता, कायदेशीर बाबी विचारात घेऊन मे २०२५पर्यंत कर्मचाऱ्यांचे उपदान व अंतिम देयके अदा करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन अध्यक्षांनी कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, महापालिकेने अर्थसंकल्पात बेस्टसाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून, त्यापैकी ५०० कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत.

धुंदलवाडी आरोग्य केंद्रातील कारभारावर प्रश्नचिन्ह

■डहाणू। प्रतिनिधी,

डहाणू तालुक्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून प्राथमिक आरोग्य केंद्र धुंदलवाडी रात्रीच्या वेळी बंद राहत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. धुंदलवाडी उपकेंद्राच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्यामुळे हे उपकेंद्र सध्या बाहरे येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. मात्र या ठिकाणी नागरिकांना नियमित आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळत नसल्याचा गंभीर आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

पालघर जिल्ह्यात यापूर्वीही गरोदर माता व नवजात बालकांच्या मृत्यूच्या घटनांमुळे आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत धुंदलवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वास्तव अधिकच चिंताजनक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, बाहरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सकाळी सुमारे ९.३० वाजता सुरू होते. मात्र संध्याकाळनंतर उपकेंद्र बंद केले जात असून रात्रीच्या वेळी डॉक्टर, परिचारिका किंवा इतर आरोग्य कर्मचारी उपलब्ध राहत नाहीत. त्यामुळे बाहरे, धुंदलवाडी, चाररस्ता, हळदपाडा, वंकास, पुजावे, सासवंद आणि परिसरातील हजारो नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रात्रीच्या वेळी एखादी गरोदर महिला प्रसूती वेदनेत असली, अपघातग्रस्त रुग्णाला तातडीची मदत हवी असली किंवा एखाद्या गंभीर आजाराच्या रुग्णाची प्रकृती अचानक बिघडली, तर त्यांना त्वरित उपचारासाठी कुठे जावे, असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

या संदर्भात उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, ''बाहरे येथे डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांसाठी राहण्याची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्याने रात्री उपकेंद्र सुरू ठेवणे शक्य होत नाही,'' अशी माहिती त्यांनी दिल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मात्र या स्पष्टीकरणामुळे आणखी अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. जर राहण्याची व्यवस्था उपलब्ध नाही, तर २४ तास आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी कोण पार पाडणार? रात्रीच्या ड्युटीचे नियोजन कसे केले जाते? ड्युटी रजिस्टरमधील नोंदी कोणत्या आधारावर केल्या जातात? शासनाकडून वेतन घेत असताना नागरिकांना अपेक्षित सेवा का दिली जात नाही? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.स्थानिकांच्या मते, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी शासन कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत आहे. मात्र प्रत्यक्षात उपकेंद्रांवर कुलूप लागलेले दिसत असल्याने आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच बाहरे येथील उपकेंद्रात २४ तास डॉक्टर, परिचारिका आणि आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी जोरदार मागणी आता ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



3 भावांवर काळाचा घाला

पोहायला गेले... नदीत बुडून दुर्दैवी अंत



■बीड। प्रतिनिधी,

रत्नागिरीच्या खेड शहरातील जगबुडी नदीत पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. हा धक्कादायक प्रकार बुधवारी उघडकीस आला आहे. सुट्टीसाठी नातेवाईकांकडे आलेल्या तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेनं परिसरात शोककळा पसरली आहे. परिसरात एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.

मृत तरुणांची नावे आली समोर

मृतांची आकाश कांबळे, नरेश कांबळे आणि कैलास कांबळे अशी ओळख समोर आली आहे. हे तिघेजण मूळचे सांगली जिल्ह्यातील असून अनेक वर्षांपासून मुंबईतील कुर्ला येथे राहत होते. उन्हाळ्यात सुट्टीचा आनंद घेण्यासाठी ते रत्नागिरीतील खेड येथे आपल्या नातेवाईकांसोबत नदीत पोहण्यासाठी गेले असता, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने त्यांचा नदीत बुडून मृत्यू झाला.

नदीत बुडून तिघांचा दुर्दैवी मृत्यू

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी आले. पोलिसांनी रेस्कू पथकाच्या मदतीने परिस्थिती हाताळली. बचावकार्यादरम्यान एका तरुणाला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले. मात्र आकाश, नरेश आणि कैलास यांना वाचवण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. यामुळे पाण्यात बुडून तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. संबंधित घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुर्दैवी घटनेनं खेड तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

उन्हाळ्यात अशा वारंवार घटना घडताना दिसून येत आहेत. स्थानिक प्रशासन किंवा नदी तसेच पाण्याच्या भोवतालच्या परिसरात जाण्यास प्रशासनाने निर्बंध लादावे, जणेकरून अशा घटना घडणार नाहीत.

ठाणे हादरलं! किरकोळ वादातून परप्रांतीयाची वृद्धाला बेदम मारहाण, व्हिडिओ व्हायरल होताच...

■ठाणे। प्रतिनिधी,

गुन्ह्यांच्या अनेक घटनांनी राज्यात सध्या गदारोळ माजला आहे. कुठे चोरी, कुठे दरोज, खून तर कधी अत्याचार मुंबईपालून हाकेच्या अंतरावर असलेल्या ठाण्यात घडलेल्या घटनेने अख्खं शहर हादरलं आहे. ठाण्यात एक वयोवृद्ध नागरिकाला परप्रांतीय चालकाने बेदम मारहाण केल्याचे समोर आहे. अगदी किरकोळ कारणावरून त्या चालकाने वृद्ध नागरिकाला मारला, बेदम मारहाण केली, त्यातच तो वृद्ध माणसून खाली पडून जखमीही झाला. एवढंच नव्हे तर तो चालक सातत्याने त्या इसमाला शिव्याही देत होता. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली.

मात्र सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल होताच दोन्ही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेची दखल घेतली. आणि त्या 'त्या' परप्रांतीय ओला चालकाचा तत्काळ शोध घेत त्याला पकडून शिवसेना स्टाईलने चोप दिला. त्यानतंर त्याला पोलिसांच्या हवाली करण्यात आलं. याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान शिवसेना ठाकरे गटाचे सुमित बोराडे तसेच शिवसेना शिंदे गटाचे नितेश पाटोळे हे दोन्ही शिवसेनेचे पदाधिकारी यांनी पाहिला. त्यानंतर, दोन्ही शिवसेनेचे पदाधिकारी, बोराडे आणि पाटोळे यांनी तात्काळ शोध घेऊन 'त्या' परप्रांतीय ओला चालकाला पकडलं आणि शिवसेना स्टाईलने चोप दिला. त्यानंतर घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी आरोपीला तात्काळ वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केलं. त्याच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.



परप्रांतीय ओला चालकाची वृद्धाला शिवीगाळ आणि बेदम मारहाण

मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलच्या बाहेर काल संध्याकाळी सहा वाजताच्या सुमारास एका परप्रांतीय ओला चालकाचा किरकोळ कारणावरून वृद्ध व्यक्तीशी वाद झाला. मात्र त्यीनमंतर त्या चालकाने त्या व्यक्तीचं वय, स्थळ काळ काहीच न पाहात, त्या इसमाला डायरेक्ट मारहाण सुरू केली. त्या वृद्ध माणसाला त्या चालकाने मारलं, खाली ढकललं, तो दाणकन खाली आपटला. त्याच्यासोबत असेलली वृद्ध महिला त्याला वाचवायचा प्रयत्न करत होती,. मात्र संतापलेला चालक त्याला आणखीनच मारत होता, वरतून त्याने त्याला शिवीगाळही केली. आसपासच्या लोकांनी त्याला समजावण्याचा प्रत्तन केला, मात्र त्याने कोणाचच ऐकलं नाही. त्याच्या शिव्या सुरूच होत्या. हा धक्कादायक प्रकार व्हिडीत कैद झाला आणि कोणीतरी तो सोशल मीडियावर अपलोड करताच पाहता पाहता प्रचंड व्हायरल झाला. यामुळे ठाणेकर हादरले, लोकांमध्ये संतापाची लाट उसळली.

नवरा कामावरुन आला अन् बायकोने थेट गुप्तांगावरच केले वार



■मुंबई । प्रतिनिधी,

बिहारमधील मुंगेर येथून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे राहणारा मोहम्मद फैसल खान याच्यावर त्याची पत्नी इशरत हसन उर्फ सानिया हिने धारदार शस्त्राने गुप्तांगावर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. या घटनेनंतर आरोपी सानिया घरातील दागिने आणि आपल्या चार महिन्यांच्या मुलीला घेऊन घटनास्थळावरून फरार झाली आहे. घटनेनंतर कुटुंबीयांनी फैसलला जखमी अवस्थेत उपचारासाठी तातडीने सदर रुग्णालयात दाखल केले. तिथे त्याच्या गुप्तांगावर चार टाके घालण्यात आले असून, डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार सध्या मोहम्मद फैसलची प्रकृती धोक्याबाहेर आहे. पीडित फैसलने सांगितले की, त्याचा विवाह 13 एप्रिल 2025 रोजी भागलपूर जिल्ह्यातील कबीरपूर येथील रहिवासी असलेल्या इशरत हसन उर्फ सानियासोबत झाला होता. लग्नानंतर सुरुवातीला सर्व काही ठीक होते, मात्र काही महिन्यांतच पत्नीचे दुसऱ्या व्यक्तीसोबत अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून त्यांच्यात वाद सुरू झाले. फैसलने असा आरोप केला आहे की, त्याच्या पत्नीचे दुसऱ्या पुरुषासोबत प्रेमसंबंध असून ती अनेकदा त्याच्याशी फोनवर बोलते. यावरून पती-पत्नीमध्ये सतत वाद होत होते आणि सानिया पतीपासून वेगळे राहण्याचा हट्ट करत होती. घटनेच्या एक दिवस आधीही सानियाचा फैसलच्या आईसोबत वाद झाला होता. घटनेच्या दिवशी संध्याकाळी फैसल कामावरून घरी परतला आणि झोपायला गेला, तेव्हा पुन्हा त्यांच्यात वाद सुरू झाला. वाद वाढल्याने सानियाने फैसलच्या गुप्तांगावर धारदार शस्त्राने वार केले, ज्यामुळे तो रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी सांगितले की, हे पती-पत्नीमधील वादाचे प्रकरण आहे. प्राथमिक माहितीनुसार, पती आपल्या पत्नीला मारहाण करत असे. या संपूर्ण प्रकरणात पोलिसांकडून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

आधी राखी बांधून घेतली, अन् मग अश्लील फोटो बनवले... मोठ्या कांडात डॉक्टरही अडकला

■बीड। प्रतिनिधी,

एका 21 वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून, पीडित कुटुंबाने अतिशय गंभीर आरोप केले आहेत. पीडित कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, इरशाद अली नावाच्या आरोपीने त्यांच्या मुलीचे धर्मांतरण करण्याचा प्रयत्न केला आणि तिला सीरियाला नेण्याची धमकी दिली. या संपूर्ण कटात पीजीआयमधील एका डॉक्टरचाही हात असल्याचा संशय कुटुंबाने व्यक्त केला असून, या प्रकरणाने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

डॉक्टर अजमल आश्रय दिल्याचा आरोप

तपासाचा फास आता पीजीआयमधील डॉक्टर अजमल यांच्याभोवतीही आवळला जात आहे. आरोपीला संरक्षण दिल्याचा संशय असल्याने पोलिसांनी डॉक्टर अजमल यांना तपासादरम्यान शहर सोडून न जाण्याचे कडक निर्देश दिले आहेत. एवढेच नव्हे तर, सिंगापूरमध्ये होणाऱ्या एका कार्यक्रमासाठी डॉक्टर अजमल यांच्या परदेश प्रवासावरही पोलिसांनी बंदी घातली आहे. त्यांच्यावर पीजीआय परिसरात आणि पहलगाम येथे दोन मशीद उभारणीत भूमिका बजावल्याचाही आरोप आहे.

डॉक्टर अजमल यांच्यावरील या आरोपांमुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले असून, पोलीस या सर्व पैलूंची सखोल चौकशी करत आहेत. ही घटना उत्तर प्रदेशची राजधानी लखनौमध्ये केजीएमयू नंतर आता प्रतिष्ठेच्या पीजीआय परिसरातून समोर आली आहे, ज्यामुळे पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

पीडित तरुणी 21 मे 2026 रोजी नोकरीनिमित्त कामासाठी घराबाहेर पडली होती, मात्र ती परतली नाही. तिची सीसीटीव्ही फुटेज आता तपासाचा महत्त्वाचा भाग बनली आहेत. कुटुंबाने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी इरशादने पूर्वी राखी बांधून विश्वासात घेतले होते आणि नंतर कुटुंबात वारंवार येणे-जाणे सुरू केले होते. त्यानंतर त्याने तरुणीच्या आक्षेपार्ह प्रतिमा तयार करून तिला सीरियाला नेण्याची धमकी दिली. या घटनेमुळे सामाजिक संघटनांमध्ये प्रचंड संताप असून, अखिल भारत हिंदू महासभाने तरुणीची तत्काळ सुटका न झाल्यास पोलीस आयुक्तांच्या कार्यालयाला घेराव घालण्याचा इशारा दिला आहे.



अटकेसाठी पोलीस पथके रवाना

या गंभीर प्रकरणाची दखल घेत लखनौ पोलिसांनी तपास सुरू केला आहे. बेपत्ता तरुणीचा शोध घेण्यासाठी आणि मुख्य आरोपीला गजाआड करण्यासाठी पोलिसांनी तीन विशेष पथके गठित केली आहेत. तपासादरम्यान पोलिसांनी दोन व्यक्तींना ताब्यात घेतले असून, त्यांची कसून चौकशी केली जात आहे, ज्यातून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे. मुख्य आरोपी इरशाद अली याचा फोन सध्या सर्व्हिलन्सवर ठेवण्यात आला असून, त्याच्या अटकेसाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणातील प्रत्येक दुवा तपासला जात असून तरुणीला लवकरात लवकर शोधून काढण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

लाथा आणि ठोसे मारून निर्दयपणे मारहाण

पीडितेनं सहन केलेला त्रास आपल्या आई वडिलांना सांगितला असता, त्यांनी सासरच्या मंडळींना समजवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा कोणताही परिणाम झाला नाही, त्यांचे अत्याचार दिवसेंदिवस वाढू लागले होते. यानंतर सासरच्या मंडळींनी पीडितेला लाथा आणि ठोसे मारून निर्दयपणे मारहाण केली, तेव्हा क्रूरतेच्या सर्व मयार्दा ओलांडल्या. नंतर डिसेंबर 2025 रोजी, आरोपी नवऱ्याने पीडितेला जबरदस्ती करत मामाच्या घरी नेले आणि तिथेच सोडून दिले. या घटनेला बराच वेळ लोटून गेल्यानंतर आरोपी नवऱ्याने पत्नीची विचारपूस करण्यासाठी साधी माहेरी भेट देखील दिली नाही, तसेच तिला सन्मानाने घरी आणण्यासाठी कोणताही पुढाकार घेतला नाही.

वर्ध्यात नवऱ्यानेच बायकोचे अश्लील व्हिडिओ नातेवाईकांना पाठवले, एवढ्यावरच न थांबत...



■वर्धा। प्रतिनिधी,

वर्ध्यातील हिंगणघाटात एक लज्जास्पद प्रकार उघडकीस आला आहे. ज्यात पतीने आणि त्याच्या कुटुंबीयांनी विवाहित महिलेचा केवळ शारीरिक आणि मानसिक छळ केला, नाहीतर क्रूरतेची परिसीमा ओलांडली आहे. नवऱ्याने पत्नीचे खाजगी आणि आक्षेपार्ह फोटो तिच्या नातेवाईकांसह मित्रांजवळ प्रसारित केले. महिलेच्या आत्मसन्मानाला आणि सामाजिक प्रतिष्ठेला मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणी आरोपींवर पोलिसांनी कारवाई करत पाच जणांविरूद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला.

पीडित तरुणीचा शारीरिक आणि मानसिक छळ अन् पैशांसाठी दबाव

घडलेल्या घटनेनुसार, 28 वर्षीय पीडित तरुणीने धाडस दाखवून वर्धा पोलिसांत तक्रार दाखल केली. तिने घडलेला सर्व प्रकार आपल्या नातेवाईकांना सांगितला. तिच्या सासरच्यांनी तिच्याकडे अधिक पैशांसाठी दबाव आणण्यास सुरूवात केली. जेव्हा तिने हे करण्यास नकार दिला तेव्हा, तिची शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला.

पत्नीचे काही खाजगी फोटो आणि आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर केले शेअर

आरोपी नवऱ्याने एवढ्यावरच छळ न थांबवता, पत्नीला माहेरी सोडून दिल्यानंतर, सूड घेण्यासाठी आणि तिला समाजात पूर्णपणे बदनाम करण्यासाठी त्याने घृणास्पद कृत्य केले. त्याने आपल्या मोबाईल फोनमध्ये असलेले पत्नीचे काही खाजगी फोटो आणि आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर नातेवाईक आणि निवडक मित्रांना पाठवले. आपल्याच पतीच्या या घृणास्पद आणि अवमानास्पद कृत्याबाबतची माहिती कळाल्यानंतर, पीडित महिला पूर्णपणे खचून गेली.



पीडितेचा सर्व संयम सुटल्यानंतर तिने 6 जून रोजी पोलीस ठाण्यात धाव घेत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोर आपल्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला. महिलेची तक्रार गांभीर्याने घेऊन, हिंगणघाट पोलिसांनी तात्काळपणे कायद्याची अंमलबजावणी करत आरोपी नवरा आणि इतर पाच नातेवाईकांविरूद्ध हुंड, मारहाण आणि सायबर कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

गुंगीचे औषध देत लॉजवर नेलं नंतर ब्लॅकमेल करत...

■बीड। प्रतिनिधी,

बीडमध्ये माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बीडच्या अंबाजोगाईत शिक्षण घेणाऱ्या 20 वर्षीय तरुणीला गुंगीचं औषध देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. नराधम इथवर न थांबता त्याने पीडितेकडून 3 लाख रुपयांसह साडेनऊ तोळे सोने उकळले. संबंधित प्रकार हा शनिवारी उघडकीस आला. या घटनेनं परिसर पूरता हादरून गेला आहे.

केज तालुक्यातील तरुणी अंबाजोगाई येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी राहत होती. तेव्हा तिची ओळख महेश करपे आणि पवन कराड नावाच्या दोन तरुणांशी झाली. नंतर दोन तरुण सतत तिचा पाठलाग करायचे. त्यापैकी महेश करपेनं तिला एकदा जबरदस्तीने मंचुरियन खायला घातले होते. मंचुरियन खाऊ घातल्याने पीडितेला गुंगी आली, याचाच फायदा घेत नराधमाने तिच्यावर अत्याचार केला.

या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

पवन कराड नावाच्या तरुणाने देखील गुंगीचे औषध देऊन तिच्यावर लॉजवर अत्याचार केला. नराधम एवढ्यावर न थांबता त्याने तिचे फोटो आणि व्हिडिओ लोकांना दाखवतो अशी धमकी देखील दिली. नंतर ब्लॅकमेल करत तिचे वारंवार शारीरिक शोषण केले. पोलीस ठाण्यात दिलेल्या कबुलीत सर्व नमूद करण्यात आले होते. दरम्यान, पोलीस या सर्व प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com